
चैतन्य लहरी
1990
मराठी आवृत्ति

खंड 2 अंक 5 व 6
6 व 7



एक नवे पर्व सुरु झाले आहे. जिथे आपले प्रश्नच राहिले नाहीत. सर्वांचे प्रश्न, सा-या विश्वाचे प्रश्न, आपले प्रश्न झाले आहेत. यांसाठी प्रबलता, महती, एक उत्तुंगता पाहिजे. याची जबाबदारी तुम्हां लोकांवर आहे. हे सर्व घरोघरी पोहोचवायचे आहे. सर्वांना आनंद द्यावयाचा आहे. ज्या प्रकाशाला आपण प्राप्त केले, तोच आपण सर्वांना द्यावयाचा आहे - पूर्ण आत्मविश्वासासह.

- श्री माताजी निर्मलादेवी.

## उत्तर भारत दौरा 1990

श्री माताजींचा उत्तर भारताचा दौरा जयपूरचा उत्साही हर्षभरित स्वागतासह चालू झाला. "गोविंद जी मंदीर", जिथे प्रथमच, अशा तऱ्हेचे कार्यक्रम करण्यास जयपूरच्या महाराणींनी अनुमती दिली, तिथे दोन यशस्वी कार्यक्रम झाले. जयपूरचा सर्वात मोठा उत्सव "गंगौरी" चा. "गंगौरी" म्हणजेच श्री गणेश व श्री गौरी माता यांचे पूजन, असे श्री माताजींनी विशद केले. पूर्वापार चालत आलेल्या रितीरिवाजानुसार या देवतांच्या प्रतिमांची प्रथम जयपूरच्या महाराणी पुजा करतात, आणि त्यानंतर पूर्ण शहरांतून सुशोभित केलेल्या हत्ती, घोड्यांवरून, पूर्ण शहरातून रंगीबिरंगी मिरवणूक काढली जाते. मिरवणुकीच्या वेळी आशिर्वाद घेण्यासाठी हजारो लोकांची गर्दी उसळते.

यावेळी मिरवणुकीआधी, जयपूरच्या राजघराण्याने एका सुरेख परंपरागत समारंभात श्री माताजींची पुजा केली. श्री माताजींनी मिरवणूकीत न्यावयाच्या मुर्तींना व्हायब्रेशन्स दिले, आणि अशा प्रकारे जयपूरच्या लोकांना परमचैतन्याने आशिर्वादीत केले.

हरियाना

यानंतर कर्नाल आणि यमुनानगर येथें दोन कार्यक्रम आयोजित केले गेले. महाभारतांतील कर्ण, ज्याने कुरुक्षेत्राच्या पुण्यभुमीजवळ इथे स्वतःची छावणी उभारली होती, त्यावरून या जागेचे नाव "कर्नाल" पडले असे श्री माताजींनी विशद केले. कार्यक्रमाच्या वेळी सभामंडप इतका भरगच्च भरला, जितके लोक आंत होते, तेवढेच बाहेर उभे होते. जागृतीचा कार्यक्रम झाल्यावर एक मूकबधीर मुलगा, श्री माताजींचे आशिर्वाद घेण्यासाठी व्यासपीठावर आला. श्री माताजींनी त्याचे विशुध्दीचक्र साफ केले आणि, अहो आश्चर्यम्! या मुलाला कंठ फुटला आणि ऐकावयास येऊ लागले! या चमत्कारामुळे या भागात सहजयोग वणव्यासारखा पसरला.

दिल्ली

दिल्लीच्या रामलीला मैदानावर अनेक ऐतिहासिक घटना घडल्या आहेत. राष्ट्राचं भवितव्य घडविणाऱ्या अनेक मुत्सद्यांनी हे अत्युत्तम दा घडविलेले व्यासपीठ भूषविले आहे. पण आदिशक्तीच्या व्हायब्रेशन्सनी, चैतन्य लहरींनी ते याआधी कधीच आशिर्वादीत झाले नव्हते. आणि यावेळी हजारोंना जागृति मिळाली.

दिल्ली शहराला तीन वेळा आशिर्वाद मिळाले. प्रथम श्री माताजींच्या वाढदिवस पुजेच्या वेळचा समारंभ, नंतर सर श्री. सी.पी. श्रीवास्तवांच्या 70 व्या वाढदिवसाच्या वेळचा समारंभ, आणि सात एप्रिलचा त्यांच्या लग्नाच्या वाढदिवसाचा समारंभ. सहजयोगी मंडळींनी, श्री श्रीवास्तव साहेब यांना "पापाजी" असे संबोधावे याविषयी त्यांची अनुमती घेतली, आणि त्यांनी ती दिली सुध्दा. आपल्या हृदयस्पर्शी भाषांत ते म्हणाले, "मातेचे प्रेम हे जरी निःसंशय महान असले, तरी पित्याचे प्रेम त्याहून कमी नाही. याची तुम्हाला खात्री करून द्यावयाची आहे, मला." देबू चौधरींच्या सतारीने त्या संध्याकाळच्या आनंदमय वातावरणांत भरच पडली.

कलकत्ता

बंगालमध्ये विणलेल्या सिल्कच्या साडीने परंपरागत देवीपुजा केली जाते. तिच्या बालकांच्या भक्तिने देवी आनंदाने इतकी पुलकित झाली की, प्रथमच, कलकत्त्यामध्ये, देवीच्या आदिशक्ति स्वरूपाची पूजा केली गेली. देवी कृपेने प्रत्येकजण ध्यानामध्ये इतका गहन होत गेला आणि बदललेल्या स्थितीमध्ये वर आला. ट्विोली पार्कच्या दोन जाहीर कार्यक्रमांमध्ये त्या स्थितीची गहनता वाढलेली सर्वांनी अनुभवली. सर्वात नेत्रदिपक भाग म्हणजे हुबळी नदीवरची सर्व सहजयोगींची लॉंचमधील सफर! ही तर अक्षरशः गंगेत स्वच्छ होण्यासाठी मारलेली बुडी होती. कारण श्री माताजींनी सर्व सहजयोग्यांना स्वच्छ केले. नवीन सहजयोग्यांची सगळ्यांशी ओळख करून दिली जात होती. सहजयोग्यांच्या गाण्या-नाचण्याने वेळ कसा गेला कळलेच नाही.

**मुंबई**

कदाचित मुंबईला श्री माताजींचे जास्तीत जास्त कार्यक्रम झाले आहेत. पण या वेळच्या साधकांची संख्या आणि गुणवत्ता पहिल्यापेक्षा खूपच उच्च स्तराची होती. सहजयोगाचं नवं पर्व खरोखरच सुरू झालं आहे. जागृतीनंतर सर्व साधक गहन ध्यानामध्येच बसून राहिले. श्री माताजी निघेपर्यन्त कोणीही हललंसुध्दा नाही। इतक्या मोठया संख्येच्या नव्या साधकाबरोबर इतकी गहनता सामुहिकतेमध्ये अनुभवणं ही फार दुर्मिळ मेजवानीच होती. दुस-या दिवशी श्री माताजी मस्कतला रवाना झाल्या, एमिरेटस ला नवी क्षितीजे उघडण्यासाठी.

**श्री माताजींचे वाढदिवसानिमित्त पुजेच्या वेळचे भाषण** मुंबई

24 मार्च 1990

आता वीस वर्षे झाली सहजयोग करतां करतां, त्यावर जेवढे कार्य व्हायला हवे होते तेवढे झाले नाही असें मला वाटते. त्याचे कारण आहे, असें की आपल्या लोकांना हे किती महान कार्य आहे याचे ज्ञान नाही. किती दिव्य आहे। असं कार्य कधी झालंच नाही. असं कोणत्याही अवतारामध्ये झालं नाही. सर्व बाजुने आपण सहजयोगाकडे दृष्टी टाका, समाजांतसुध्दा यामुळे किती फरक पडला आहे. स्वातंत्र्यांनंतर लोक जे स्वैराचारामध्ये अडकणार होते, दुस-या देशांमध्ये जे अडकले, आणि ज्यांचा पूर्णपणे सर्वनाश झाला होता, अशा देशात सुध्दा सहजयोगाने अनेकांना वाचविले. असे कधी कुठे घडलेच नव्हते. अनेक अवतार झाले पण कोणालाही अशी अंतर्यामी शक्ति मिळाली नाही, ज्यायोगे ती त्याच्या आंत प्रस्थापित होईल.

लोक सतत कांही ना कांही करीत असतात. कोणी स्वतःला हिंदु, कोणी मुसलमान, कोणी ख्रिश्चन, कोणी कांही समजतो. आणि सर्वांनाच असे वाटते की इतर सर्वांपेक्षा आम्ही चांगले आहोत. पण यापैकी असा कोणताच धर्म नाहीं की ज्या धर्मात राहिल्यामुळे आपण धार्मिक होतो. कोणतीही व्यक्ति कोणतेही पाप करू शकते, कोणत्याही धर्माच्या नांवावर. कोणत्याही धर्माचे बंधन नाही. सहजयोगामध्ये आत्म्याचे बंधन पडते. आत्म्याची जागृति फार महान गोष्ट आहे, जी आपल्या जीवनाला प्रकाशित करते. या संबंधी सर्व अवतरणांनी सांगीतले आहे, कीं आपण "स्व" ला जाणा. "स्व" ला जाणल्याशिवाय काही होऊ शकत नाही.

आणि ती वेळ ज्याविषयी त्यांनी सांगीतले होते ती आता आली आहे. आणि अजूनही लोक आंधळयाप्रमाणे फिरत आहेत. आणि आपल्या हे लक्षातच येत नाही, की आपल्याकडे किती महान शक्ति आली आहे. आपण तिला किती वाढवली पाहिजे, आपले उत्तरदायित्व काय आहे। अजूनही आपण छोटया छोटया गोष्टीत गोंधळून जातो. आश्चर्याची गोष्ट आहे। हो, धार्मिकता तर आली, पण छोटया छोटया अशा अनेक गोष्टी ज्या आपल्याला अडचणीत टाकतात. आणि ही मोठी पुरातन गोष्ट आहे. सहजयोग इतका गहन आहे, इतका सूक्ष्म आहे. आपली दृष्टी सुध्दां सूक्ष्म झाली आहे. आपल्याशी काय झाले आहे, हे आपल्याला स्वतःला समजत नाही.

आणि म्हणून आज वीस वर्षे उलटली तरी सहजयोगात लोकांची उन्नीत जेवढी व्हायला हवी तेवढी होऊ शकली नाही. ना आंत, ना बाहेर। आपापसातील भांडणांनी फार सूक्ष्म रूप घेतले आहे. ज्याला "मस्त मौला" म्हणतात ती गोष्ट नाहीच. अलिकडेच मी ऑस्ट्रेलियाला गेले होते. तिथे मी हैराण झाले, ऑस्ट्रेलियामध्ये इतके काम केले, इतक्या हजारो लोकांना पार केले, त्यानंतर प्रत्येक केंद्रातून पन्नास पन्नास लोकांना काढून टाकले. पन्नास, पन्नास लोकांना सांगितले की आपण काही कामाचे नाही, निघुन जा. निरनिराळ्या मार्गांनी पैसे एकत्र केले, शिवाय अनेक विचित्र गोष्टी केल्या, मला कधी वाटलंही नव्हतं की सहजयोगी अशा गोष्टी करू शकतील। शिवाय आपापसात पुढारीपणा साठी भांडणे। मला पाहून सगळे रडू लागले, कीं "माताजी, आपण कुठे गेला होता।" सगळीकडे मी जे काही पाहिले,

अडचणी फार सूक्ष्म असल्या आहेत. आपापसातील प्रेम, नाती यांविषयी समजूतदारपणा जोपर्यंत आपल्यामध्ये येत नाही तोपर्यंत हा आनंद आपण मिळवू शकत नाही. आम्हा लोकांची आपापसातील नाती इतकी सुंदर आहेत, इतकी नाजूक आहेत, इतकी चांगली आहेत, की ती समजून घेतल्याशिवाय आपण राहिलो तर कदाचित ती तुटून जातील. कारण यानंतर दिसून आलं की, परत सगळे लोक एकत्र आले. पुन्हा आनंदात मग्न झाले, सगळेच्या सगळे एकत्र होऊन आंत गेले.

तेव्हा आपण आनंदाच्या सागरात पोहत आहोत, ही आपल्या दृष्टिने एक महान गोष्ट आहे आणि आनंद आपण प्राप्त करून घेतला आहे. आता त्याला वाटायचे आहे. त्या आनंदाला शाश्वत बनवायचे आहे. जर आपला क्षुद्रपणा आपण कायमचा सोडला तरच आनंद शाश्वत राहू शकतो. जसा एखादा पाण्याचा थेंब समुद्र होतो, तेव्हा त्याचा सर्व क्षुद्रपणा संपतो. त्याच्या सर्व मर्यादा तुटतात व त्या सागराबरोबर तो वर, खाली होत रहातो. आणि त्या सागरा बरोबरच सर्व कार्य करीत असतो. म्हणजे, त्या परम चैतन्याला आपण जाणतो, जे सर्व काळ आपल्याकडे पहात असते, आपला सांभाळ करीत असतं, आपल्या कार्याकडे लक्ष ठेवीत असतं, त्या परम चैतन्यावर आपण सर्व काही सोडून दिलं आहे. हे परम चैतन्य इतकं कार्यान्वित आहे की त्याची कमाल आहे. त्या पध्दतीने ते कार्य करतं, जे काही करतं, ते केवळ आपल्या प्रहासाठी व हितासाठी. पूर्ण वेळ त्याचे कार्य चालू असते.

आणि त्या कार्यात आपल्याला काही करायचं नाही. फक्त आपल्याला त्यामध्ये एकरूप व्हावयाचं आहे, एकजीव व्हावयाचं आहे. एक नवीन जग आपल्याला प्रस्थापित करायचं आहे आणि त्या जगात हजारोंच्या संख्येने आपल्याला उतरायचं आहे.

विशेषतः मुंबईमध्ये फार मेहनत केली आहे. फार वर्षापासून मेहनत केली आहे. आणि त्या मेहनतीमुळे, सकाळी उठल्यावर रोज सर्वांनी विचार करायला हवा की सहज योगासाठी आपण काय केले आहे. आज आपण काय करणार आहोत. आणि सायंकाळी विचार करायला हवा, की आज आपण सहजयोगासाठी काय केलं ? व पुढे काय करणार आहोत? आपले विचार जर सतत सहजयोगाचेच असतील, तर अंतर्यामी शांतता असते व असे विचार प्रस्थापित होतात की आपण तर काहीच करीत नाही. आपण काही कोणत्याही गोष्टीचा ठेका घेतला नाही, तर परमचैतन्यच सर्व कार्य करीत आहे.

मी जेव्हा रशियाला गेले होते, तेव्हा दोन हजार लोक आंत होते व दोन हजार बाहेर होते आणि सर्व दोन हजार पार झाले. ~~स्वीकृ~~ मॉस्को, व लेनिनग्राडला गेले. मी पाहिले, त्या लोकांच्यात किती गहनता आहे. आम्ही कॅनबेराला गेलो होतो, तेव्हा रशियन दूतावासांतून सात लोक आले व पार झाले.

तेव्हा, आपल्या अंतर्यामी मानव-निर्मित धर्माचा प्रभाव जास्त आहे की अहंकाराची जबरदस्त छाप आहे, हे समजत नाही. याचा विचार करायला हवा की सहज योगासाठी आपण तयार आहोत की नाही. आपण त्याचे शिपाई आहोत. परमेश्वराने आपल्याला त्यासाठी निवडले आहे. व या कार्यात तो आपला उपयोग करून घेणार आहे. परमचैतन्याला असेच गहन लोक हवे आहेत. दोन,चारच लोक जर गहनतेत उतरलेले असतील, तर देशाचं कल्याण होऊ शकतं. जसं पूर्व युरोपीय देशांतील सर्व लोक पार झाले, व जेव्हा ते आपल्या देशांत परत गेले तेव्हा त्या देशांत बदल घडून आले. बर्लिनची भिंत पाडली. यांना म्हणतात गहनतेत उतरलेले लोक.

पण आपल्याकडे ही गोष्ट नाही. ही गहनता नाही. लहान लहान गोष्टींवरुन आपण भांडणे करतो. काहीतरी अडचणी आहेत. आपण सर्व काम करीत असतो, हे करायचं आहे, ते करायचं आहे. पण ते मुख्य नाही. मुख्य आहे सहजयोग. सहजयोग करावा व सहजयोगाला पूर्णतया चिकटून रहावं म्हणून तुम्ही जगात आले आहात. म्हणून आपल्या देशाचे कल्याण होत नाही. इतके मोठे सहजयोगी बसले आहेत, या देशाचं किती मोठं कल्याण व्हावयाला हवं. पण होत नाही, याचं कारण काय असावं? केवळ तीन-चार लोकांनी {तिकडे} संपूर्ण देश बदलवून टाकला.

ऑस्ट्रेलियामध्ये सुध्दां मी पाहिलं, तिकडे प्रथम काही कैदी लोक गेले. त्यांच्याबरोबर जेलर पण गेले अशी

ब-याच लोकांचं असं असतं की रात्री जर गाडीने अथवा विमानाने जायचं असेल तर जणूकाही आपत्तिच आली. तुम्ही परम चैतन्याच्या आस-यामधे बसला आहात. ते सर्व करत आहे, तर तुम्ही शांत बसा. काय होत आहे ते पहा. जसं व्हावयाला हवं तसंच होणार आहे.

सहज योगात, एक दुस-याचा तिरस्कार करणं महापाप आहे. तुम्हाला जर कोणाचा तिरस्कार वाटत असेल तर जाऊन त्याच्याशी प्रेमाने बोला. त्याला दोन-चार वस्तु प्रेझेंट द्या. ज्या दुष्ट प्रवृत्ति आहेत, त्यांचे बाबतीत तुम्ही म्हणू शकता की त्या नष्ट होऊ दे. दुष्ट लोकांचं नष्ट होणं ठीक आहे. पण सहज योग्यांचेमधे प्रेम नाही याचा मी विचार सुध्दा करू शकत नाही. किती प्रेम असायला हवे? तुमच्या सारखं दुसरं कोण आहे? तुम्हीच तर एक दुस-याचे भाऊ बहिण आहांत. बाहेरच्या देशांतले लोक येतात तेव्हा तुम्ही त्यांना भेटत नाही, त्यांच्याशी मैत्री करत नाही. आपल्या बायको मुलांच्या कडे पहात असता. कोणी बोलत नाही, आम्हाला कोणी नांव पण सांगत नाही. वेगळे रहातात, वेगळे बसतात.

आणि प्रेमांत भाषेची कांही आवश्यकता नाही. सर्व जगभर तुमचे भाऊ बहिणी आहेत. त्यांना भेटण्यात एक प्रकारे निराळेच प्रेम, आनंद, आदर वगैरे असतात. तुम्ही लोकांनी त्यांना पत्रे लिहायला हवीत, त्यांचे फोटो तुमच्या जवळ असावेत, त्यांच्या मुलांची नावे तुम्हाला माहित असावीत, ही सर्व मंडळी कोण आहेत, कोठे आहेत हे माहिती असावं. आपापसामधील प्रेम एक महान गोष्ट आहे, एक मोठी संघ-शक्ति आहे, तिच्या पुढे कोण वाकणार नाही? सहजयोग केवळ प्रेमाची शक्ति आहे. दुसरी कोणतीही याची शक्ति नाही. प्रेमाची शक्ति एवढी जबरदस्त आहे की सर्व शक्तिंना ती कापते. चाळीस देशांत आपले लोक काम करीत आहेत. चाळीस देशात आपले बंधू भगिनी आहेत, असे कधी घडले आहे का? एक दुस-यांची काळजी करतात, मान सन्मान करतात, शिवाय जे सहजयोगी असतात, ते अतिशय चारित्र्यवान असतात. इतर स्त्री-पुरूष ज्या निरूपयोगी माया मोहानं अडकले असतात, ते या मंडळींना कधी शिवत देखील नाहीत. पूर्णपणे ते निष्काम बनतात. उदा. एक स्त्री, एक पुरुष, त्यांच्यातील संबंध असला निरर्थकपणा. जे केवळ कच-या सारखे होते, ते कच-यातून बाहेर पडून एक शुध्द आत्मस्वरुप झाले आहेत. अशा आत्म्याची किती जबरदस्त शक्ति असते. स्वतःच्या शुध्दतेमधे उतरले पाहिजे. शुध्दपणांत उतरणे याचा अर्थ अशांत होणे असा नाही. जी व्यक्ति शुध्द आहे ती कधी अशांत असूच शकत नाही. जी गोष्ट सर्वांना शुध्द करते ती अशांत कशी असेल. परंतु शुध्दपणा बरोबरच लोक फार जहाल बनतात. जसं आम्ही हे आहोत, ते आहोत, असेच आहोत, फारच चांगले आहोत, फार शिस्तीचे आहोत, सहजयोगी आहोत व बाकी सर्व टाकाऊ असं कधी मनांत आणायचं नाही. सहजयोगी विचार करतो, की सगळे माझे स्वतःचेच लोक आहेत. शुध्द गोष्ट असेल तरच ती स्वतःमधे सर्वांना सामाऊन घेईल.

' प्रत्येक वेळी खोटं बोलायचं, चुगल्या करायच्या, या सर्व अशुध्द गोष्टी आहेत, उथळपणाच्या गोष्टी आहेत. या सर्व गोष्टी करणे सहज योगात अमान्य आहे. एखाद्याच्या पाठीमागे बोलायचं, इकडे तिकडे जाऊन सांगायचं, दोन दोन पैशांकरता कटकट करायची. अरे सर्व लक्ष्मी तुमच्या पायाखाली आहे. तुम्हाला एवढी पैशाची अडचण काय आहे. चार पैसे जर सहजयोगाला दिले, तर जणू काही संकटच कोसळतं! विचार करा, सहज योगाकरिता अखेर तुम्ही किती पैसे दिले! त्याच्यापेक्षा जास्त तुम्ही स्वतःच्या तेलावर खर्च करता। सहजयोगात कांहीं विशेष खर्च येत नाही. याचा अर्थ असा नव्हे की आवश्यकता पडल्यास तुम्ही पैसे देऊ नये। तुम्ही प्राण देण्यास तयार असायला हवं. मग पैशाचं काय?

आज वाढदिवसाचे दिवशी तुम्हाला हेच सांगायचं आहे की माझ्याबरोबर तुम्ही पण मोठे व्हा. वयाने मोठे होणे याचा अर्थ मनुष्यात गहनता यायला हवी. एकाग्रता आहे ते ठीक आहे. पण एकाग्रतेचा अर्थ आहे. पण एकाचं एक चक्र पकडतं, दुस-याचे दुसरे चक्र पकडते, कोणाचं तिसरं, तर कुंडलिनीची जागृति, तिचे सर्व चक्रांचे मधून पार होणे व शेवटी सहस्त्रात विलीन होणे किती महान गोष्ट आहे. जे काम तुम्ही लोक करीत आहात

ते काम साधू, महर्षि, सैन्यासी अवतारी व्यक्ति यांचेपैकी कोणीही केले नाही. एवढी शक्ति आपल्या मधे आली पण या शक्तिला संभाळून ठेवायला आपल्या अंतर्यामी तेवढीच गहनता यायला हवी. जेवढे व्होल्टेज धारण करण्याची आपली क्षमता असेल तेवढेच आपल्यामधे येऊ शकते. पण हे व्होल्टेज आपण वाढवू शकतो. हे वर्ष तर विशेष रूप धारण करून आले आहे. म्हणून या सर्व गोष्टी तुमच्यापुढे सांगितल्या, की कशा त-हेने आपण आपले आंतरिक व बाह्य जीवन प्रफुल्लीत करू शकतो. ध्यान धारणे मुळे आंतरिक स्वच्छता होते. त्यात, मी सकाळी स्नान केले नाही, तर काय करू, असे वेडेपण नाही. स्नान नाही केले तर काय झाले? मी चार वाजता उठायला हवे होते पण साडे चारला उठलो। असे काही नाही. बाह्यातलं कोणतही आवरण नाही. पण ध्यान करायला हवं, सतत ध्यानांत रहायला हवं, आपण किती काळ ध्यानांत असतो, कितीही गडबड असली तरी आपण ध्यानाच्या स्थितीत जायला हवं.

ध्यानांत जाणे यांचा अर्थ काय? याचा अर्थ आपला संबंध या परम चैतन्याशी जोडलां गेला. ज्या वेळी तुम्ही ध्यानांत जाता, त्यावेळी तुम्ही परम चैतन्याशी एकाकार होता. जेवढा वेळ आपण ध्यानांत राहू शकूं, तेवढा वेळ विचार येऊ नयेत. ध्यान एक विशिष्ट स्थिती, एक विशिष्ट व्यक्तिमत्व आहे व त्याच्या नंतर जो प्रकाश प्राप्त होतो त्याला घेऊन आपल्याला लोकांना शोधायचे आहे. त्यांच्याशी बोलायले हवं, त्यांना प्रकाश द्यायला हवा. पण ज्यावेळी तुम्ही लोकांना भेटत असता त्यावेळी ते तुमच्या प्रकाशाकडे पाहतील की खरोखरच तुमच्यामध्ये प्रकाश आहे की तुम्ही असाच खोटा दिवा घेऊन फिरत आहात। त्यावेळी जे कोणी असेल, ती व्यक्ति, तुमचे चारित्र पाहील, तुमचे व्यक्तित्व पाहिल. तुमच्यामध्ये काय आहे ते समजावून घेईल, तुम्ही काय मिळविलं ते पाहील. तुमच्या मधील अनेक उच्च स्थितीला गेलेली मंडळी, बाहेर पडून सर्व देशाचा, व सर्व जगाचा उध्दार करू शकतील.

सहज योगात कोणत्याही बाबतीत काळजी करणे मान्य नाही. कारण सर्वच काळजी जर परम चैतन्य करीत आहे. फक्त एकच चिंता असायला हवी, की मी सतत ध्यानात राहीन, आनंदात राहीन, आनंदांत काही कमतरता पडू नये, कायम मजेत रहावे.

तुमची भक्ति, प्रेम व सेवा पाहून, मी फारच खुष झाले आहे. पण स्वतःचीही थोडी सेवा करा, स्वतःचाही थोडा विचार कर, स्वतःचीही थोडी सजावट करा, आपली पण काळजी घ्या, की आपणही एक हीरा आहोत. त्यला पूर्णपणे प्राप्त करा, त्याचं ज्ञान मिळवायला हवं. सर्व जगांतले लोक विश्व निर्मल धर्मात उतरले आहेत. आपण वेगवेगळ्या देशांत रहात असलो तरी एका देशाचेच रहिवासी आहोत, तो आहे, परमात्म्याचे साम्राज्य आणि त्याच्या आनंद व उल्हासात रहात आहोत. आणि सर्वांना आनंद देत आहोत. जणु काही एखादी वाटिका आहे, तिच्याकडे पाहून अनेक लेखकांना स्फुर्ति यावी, ज्यांच्याकडे पाहून इतर लोक खुष होतील, असे तुम्ही लोक आहात. अशाच फुलांची मला अपेक्षा आहे.

माझी अशी ईच्छा आहे की, तुम्ही कांही विशेष कार्य करावं, प्रत्येक गावात, प्रत्येक खेडयात, जिथे जिथे तुम्हाला शक्य असेल तिथे आपले कार्य तर चालुच असते. एक दिवस असा येईल की एकदम फरक पडेल. आणि प्रत्येक गावी अनेक सहजयोगी दिसू लागतील. मला आशा आहे की, आज माझ्या वाढदिवसाच्या वेळी, तुम्ही नम्रतापूर्वक एक निश्चय कराल, की श्री माताजी आम्ही यावर्षी 100 लोकांना पार करू. प्रत्येक माणसाने निदान प्रयत्न तरी केलाच पाहिजे, जसा शक्य आहे तसा. प्रत्येक त-हेने लोकांना जेवायला बोलवावं, चहापाण्याला बोलवावं, त्यांनी सहजयोगात यावं असं त्यांच्याशी बोलावं. सहजयोगांत किती चमत्कार आहेत. तुम्ही त्यांना चमत्काराबद्दल सांगावं. सर्वात मोठा चमत्कार झाला आहे, तो म्हणजे, आपण एडस् बरा केला आहे. कॅन्सर बरा होतो.

अजून ब-याच लोकांना हे माहिती नाही की, कोणत्या बोटावर कोणते चक्र आहे, पण तरीसुध्दा तुम्ही सर्व एडस्चा आजार बरा करू शकता. मानसीक त्रास दूर करू शकता. सर्वांना जागृति देऊ शकता.

आणि लोकांना हे समजत नाही की, कोणत्या चक्रावर कोठे पकड आहे. त्याचे ज्ञान अवश्य असायला हवं. पुरुष असो, स्त्री असो, प्रत्येकाला हे ज्ञान हवं. पुरुषांचेकडून ज्ञान घ्यावं आणि स्त्रियांचे कडून त्यांची व्हायब्रेशन्स. त्यांच्या कडून समजूतदारपणा घ्या.

पुरुषांचे कडे बुध्दिचे ज्ञान असते तर स्त्रियांचेकडे हृदयाचे ज्ञान असते. दोन्ही गोष्टी सामान्यपणे यायला हव्यात. व जे एक प्रकारचे विश्व आपण बनविले आहे. ते जास्तीत जास्त वृध्दिंगत व्हावयाला हवे. शक्य आहे ते सर्व करायला हवे. या वर्षी विशेष मेहनत करायला हवी. प्रत्येक दिवशी, प्रत्येक क्षणी तुमच्यामुळे हजारो लोक पार होऊ दे. तुम्हाला जसा आनंद होत आहे तसा सर्व जगाला होऊ दे. तेव्हा कार्य फार मोठया प्रमाणावर व जोमाने होऊ शकेल. व आपण काहीतरी मिळवू शकू. सर्वांना माझे अनंत आशिर्वाद.

## सायंकाळचे भाषण

मुंबई
24.3.1990

सत्याच्या शोधात असणाऱ्या सर्व साधकांना आमचा नमस्कार.

माझ्या बद्दल असणारे प्रेम व भक्ति मला जाणवते. मी स्वतःकडे पाहिलं, तर मला आश्चर्य वाटतं की, त्यांच्यासाठी मी असं काय केलं आहे? जी काही मी आहे, ती आहे. त्यांत एवढं विशेष काय आहे? या जीवन कालांत मी काहीच साध्य केलं नाही. पण, मी म्हणायलाच हवं, की तुम्ही सहजयोगात जे मिळवलं आहे, त्या बद्दल मी तुमची खरोखर आभारी आहे. हे घडून येणं महत्वाचं होतं व त्याची वेळ आणि होती.

जेव्हा आपण देश विदेश, राजकारण, अर्थशास्त्र व इतर सर्वांबद्दल बोलतो, त्यावेळी ते सर्व सत्वांवर कार्यान्वित होते व या सर्व पध्दतींचे मूलभूत प्रश्न आहेत. आणि जर तुम्हाला सत्वाचंच ज्ञान असेल, तर परिस्थिती हाताळणं अतिशय सोपं आहे. तुम्ही जाणताच की कुंडलिनी आपल्यातील सत्व आहे. जर आपल्या कुंडलिनीचं उत्थापन केलं तर सर्व चक्र प्रकाशित करता येतात व आपले शारिरिक, मानसिक, भावनिक व अध्यात्मिक हित साधता येते. त्याच प्रमाणे मानवी प्रयत्नांच्या या क्षेत्रांच्या मुळाशीच व तत्वतः काहीतरी घोटाळा झाला आहे. उदा. लोकशाही कडे पहा. जी मूलभूत चूक आहे ती ही, की तिचा कल पैसा संपादन करण्याकडे आहे. आत्मा मिळविण्याकडे नाही. त्यामुळे सर्वकाही व्यापारी स्वरूपाचे होते. कारण मुलतः या प्रणालीच्या आंतच हा प्रश्न बसलेला आहे. मग याला कोंब फुटतो, तो मोठा होऊन त्याचा वृक्ष बनतो, व त्याला फुले येतात. त्याचप्रमाणे लोकशाहीला आज या सर्व समस्यांची फुले आली आहेत.

सत्तासंपादनाचे मूलभूत तत्व असे आहे की ते इतके बलशाली होते की, व्यक्तिचा सर्व ताबा जातो व तो खूप क्रूर आणि जुलमी होतो. स्टॅलीनप्रमाणे. कारण ही ईश्वरी सत्तासंपादनाची प्रवृत्ती नव्हे.

मानवी कायदे घ्या. मानवी कायद्यामध्ये मुलतः एक अडचण आहे. यामध्ये न्याय हा मानवी जीवन मूल्यांच्या मुलभूत कल्पनांवर आधारित असतो. मानवी जीवनमुल्य आपल्यामधील व्हॅलन्सी (धर्म) आहे. जसे कार्बनला चार व्हॅलन्सी असतात तसेच आपल्यामध्ये व्हॅलन्सी असते. या व्हॅलन्सींची मूलभूत संख्या 10 असते. जेव्हा आपण या व्हॅलन्सी ओलांडून जातो अथवा त्या नष्ट करण्याचा प्रयत्न करतो, अथवा त्यांचा दुरुपयोग करतो, तेव्हा आपण निसर्गाच्या नोवखाली मानवतेच्या नांवाने अथवा ईश्वराच्या नांवाने बेकायदेशीर पणे वागतो. परंतु मानवी कायद्यांमध्ये मूलभूत अडचण आहे, ती ही की लोक प्रकाशित नाहीत. त्यांच्या व्हॅलन्सीज प्रकाशित नाहीत. परंतु जोपर्यंत त्या व्हॅलन्सी प्रकाशित होत नाहीत, तोपर्यंत कोणत्याही धर्माचे पालन त्यांनी केले, कोणतेही धर्म वाचले, कोणतेही सत्कार्य

त्यांनी केले, त्यांच्या शांती, अहिंसा वगैरे कितीही महान कल्पना असू देत, मूळातच त्यांच्यामध्ये ही अंतर्गत अडच आहे की, त्यांच्या आंतमधील ह्या व्हॅल्न्सीज प्रकाशित नाहीत.

परंतु तत्वतः ही मानवी चूक नाही. ती आपल्यातील अज्ञानाची चूक आहे. आपल्यातील अज्ञान हे आ की आपण अजून आत्मा नाही हे आपण जाणत नाही. हे सर्व नियम देवदुतांसाठी आहेत, ज्यांच्या व्हॅल्न्सीज अ आल्या नाहीत, अशा मानवांसाठी नाहीत, म्हणून प्रथम सहजयोगात तुम्हाला लागतं, "मी निरपराधी आ मी कोणतीही चूक केली नाही, मी अगदी चांगला आहे." स्वतःमध्ये आत्मविश्वास आणा कारण विशिष्ट काय तुम्ही जाणत नाही. म्हणून मानवी कायद्यानुसार विनाकारण तुम्हाला गुन्हेगार ठरविले जावू शकते. तुम्हाला वर्क व चार्टर्ड अकौंन्टंट जवळ बाळगावे लागतील. नाहीतर अचानक तुम्हाला कळेल की तुम्ही जेलमध्ये आहात.

पण जर तुम्ही व्यक्तिमत्वाचे असाल तर तुम्ही कोणताही गुन्हा करीत नाही. कारण सत्वा तुमच्या मधील सर्व धर्म प्रकाशित झाले आहेत. आणि योग्य काय अयोग्य काय हे तुम्ही जाणता. पण तरी सुध्द ख्रिस्तांना क्रूसावर चढवलं गेलं, सॉक्रेटिसना विष पाजलं. या सर्व महान व्यक्तिंना, कायदे बनविणारांचा धर्म मार्तंडांचा जे धर्माला जबाबदार होते, ज्यांना फक्त आपणच योग्य आहोत असं वाटत होतं, त्यांना छळ स करावा लागला. आदिशंकराचार्यांना फार त्रास सहन करावा लागला. ज्ञानेश्वर इतके विद्वान होते, पण त्यांना सु किती त्रास सहन करावा लागला.

तर मानवांत मूलभूत अडचण ही आहे की ते प्रकाशित नाहीत. त्यांची मज्जासंस्था धर्माने भरली नाह त्यांचे पोषण नाही. तुमच्यांत धर्म असेल तर तुम्ही कोणताही गुन्हा करीत नाही. कदाचित कायदे बनविणाऱ्यांच नजरेत ती व्यक्ति गुन्हेगार असेल कारण कायद्याचे जे सूत्रधार आहेत ते स्वतःच आंधळे आहेत. माणसे प्रकाि आत्मा नाहीत, हे कायदे बनविणारे लोक जाणीत नाहीत. हीच मानवी कायद्यांची मूलभूत समस्या आहे. त्यां हे समजून घ्यायला हवं अर्थात मानवी कायदे, चेतनेत न उतरलेल्या परमेश्वरी ज्ञानातून घटित झाले आहेत पण कोणतीही शिक्षा दिली तरी सुध्दा सुधारणा होणार नाही. उलट ते अधिक वाईट होतील. कदाचित भीतीमु ते कायद्याचे पालन करतील. पण त्या भीतीचाही उपयोग नाही. कारण त्यांनी आपल्या स्वातंत्र्यात व कायद्य पालन करायला हवं या समजुतदारपणातून ती आली नाही. तेव्हा काय करायचं, तर त्यांना सहजयोगाची 'शिक्ष द्यायची( काहीतरी करून सर्व गुन्हेगारांना तुम्ही सहजयोगात आणू शकाल, तर एक दिवस ते फार चांगले लो बनतील. आपल्याकडे वाल्मिकी चे उदाहरण आहे. जो आधी दरोडेखोरच होता व मग एक महान कवि झाल

तेव्हां आधुनिक काळाचं, कलियुगाचं सत्व हे आहे की ते कृत-युगाच्या प्रभावा खाली आहे. कृत युगाच कालांत परमेश्वराची सर्वव्यापी शक्ति अनेक गोष्टी घडविणार आहे. आणि त्याचे सत्व हे आहे की, ती मानव परिवर्तन करणार आहे. ही कलियुगाची महानता आहे. नलदमयंती आख्यानांत असं सांगितलं होतं, की नल एकदां कलीला पकडले व तो त्याला ठार मारणार होता, पण कलीने त्याला स्वतःचं महात्म्य सांगितलं, की अ जे द-या डोंगरांत सत्याचा शोध घेत आहेत. ते कलियुगांत गृहस्थाश्रमी म्हणून जन्म घेतील व त्यांना साक्ष मिळेल. त्यांना सर्व ज्ञान मिळेल. कारण हे कलियुगाचे सत्व आहे, जेव्हा लोकांना या सर्व गोष्टी प्राप्त होतील कारण त्यांच्यावर कृत युगाचा प्रकाश कार्य करीत आहे. कृतयुगाच्या प्रकाशांत गोष्टी उघड होत आहेत. प्रत्ये गोष्ट उघड होत आहे व ती लोकांना समजत आहे. लोक जरी साक्षात्कारी नाहीत, तरी त्यांना ही जाणीव झा आहे, की आपल्यांत काहीतरी फारच बिघडलं आहे. आधुनिक कालाचं किंवा कलियुगाचं हे सत्व आहे.

या वेळी माझा जन्म झाला आहे, जेव्हां मला हे तुम्हाला सांगण्याचं काम करायचं आहे, की तुम्ही स्वतःम परिवर्तन करा. इतर सर्व कामां पेक्षा हे फारच वेगळं काम आहे. जेव्हां देवी आली होती त्यावेळी तीला राक्षसां मारावे लागले. तेव्हां राक्षस व मानव वेगळे होते. त्यामुळे तिला माणसांचे रक्षण करणे शक्य झाले. पण अ माणसांच्या डोक्यांत राक्षस शिरले आहेत. व त्यांना सांगणं की राक्षस तुमच्या डोक्यांत जाऊन बसले आहेत,

महाकठिण काम आहे. पशू, पाशांत असतात म्हणजे देवाच्या नियंत्रणात असतात. म्हणून त्यांचं वागणं ठीक असतं. उदा. सिंह विंचू होत नाहीत व विंचू साप होत नाहीत. पण या कलियुगांत माणसामधे हे शक्य आहे. आज तो सिंह दिसतो तर उद्या तो साप होतो व परवा त्याचा विंचू बनतो. अॅडम आणि ईव्ह यांच्या काळांत माणसाला स्वातंत्र्य दिलं होतं. त्याची परिपक्वता आज अशा प्रकारची माणसे बनण्यांत झाला आहे. या स्थितीवर पोहचल्यावर एखाद्या व्यक्तिला स्वतःची जाणीव होते की काहीतरी बिघडले आहे. माझ्या मुलांना मी काय देत आहे? मी काय करीत आहे? मी कोठे आहे? जेव्हां असे प्रश्न मनांत येतात, ती वेळ ही आहे. जेव्हां महालक्ष्मी स्वतःचा प्रकाश तुम्हाला देते, की तुम्हाला सत्याचा शोध घ्यायला हवा. जेव्हां सत्याचा शोध सुरु होतो, तेव्हां विल्यम ब्लेकने सांगितल्या प्रमाणे परमेश्वराचे लोक, सत्याच्या शोध घेतील व खरोखरच ते परमेश्वरांचे लोक बनतील. या वेळी विशेष प्रकारचे सत्याचे शोधक जन्माला येतील व इतरांनाही ते परमेश्वराची माणसे बनवतील.

तेव्हां सहजयोग, हळूहळू अनेक संत, शास्त्रज्ञ द्रष्टे व अवतरणे यांच्यातून उत्क्रांतिच्या प्रक्रिये मधून घडवला जात आहे. आणि हे सर्व आपल्या अंतर्यामी आहे. सर्व जग आपल्या अंतर्यामी आहे. या सर्व महान गोष्टी आपल्या मधे आहेत. मानव घृणास्पद नाही, तो सर्व उत्क्रांतीची परमोच्च स्थिती आहे. त्याचा तिरस्कार करावा असा तो नाही. फक्त तो अज्ञानी आहे. अज्ञानात दोर सापा सारखा दिसतो. प्रकाश असल्याशिवाय तुम्ही दोर पाहू शकत नाही. म्हणून कोणत्याही प्रकारे मी कोणालाही अपराधी म्हणणार नाही. कोणी काही जरी केलं तरी तो त्याचे परिवर्तन करुन घेऊ शकतो कारण आत्मा अजून आहे। चकाकत आहे। अनेक गोष्टींनी तो थोडा ढगाळला आहे. एखाद्याला जर, सुदैवाने ते ढग दूर करतां आले तर आत्मा चकाकत पुढे येइल.

आत्मसाक्षात्कार म्हणजे, स्वतःबद्दल तुम्हाला होणारी जाणीव तुमच्यांत काय बिघडले आहे? तुम्ही कोठे आहात? मुलांसारखे, ते मुलांसारखे होतात. जशा ते मला गोष्टी सांगतात। जीवनातील सर्व क्षेत्रांत उच्चस्थितीला असलेली मंडळी, आत्मसाक्षात्कार मिळाल्यावर लहान मुलांसारखी झाली, त्यांना स्वतःमधले प्रश्न दिसले, स्वतःबद्दल व दुस-याबद्दल ते पूर्णतया जाणू लागले. ही महान गोष्ट घडली, कारण हे आधुनिक काळाचे सत्व आहे. या वेळी आपल्याला स्वतःला व इतरांना, आपल्या मज्जासंस्थेव्दारे जाणून घ्यायचे आहे. ही घटना मानवाच्या चेतनेच्या एका नव्या क्षेत्रांतला प्रवेश आहे. युंगने त्याला सामूहिक चेतना असे म्हणजे आहे. ते प्रत्यक्षात उतरणं आहे, घटित होणं आहे, केवळ बोलणं नाही. ते एकमेकांचे खरे खुरे भाऊ बहिणी होतात. म्हणजे, ते एका पूर्णत्वाचे अविभाज्य घटक बनतात.

ईश्वरी प्रेम तुमच्यात परिवर्तन करते. कारण तुमच्यामधे ते अंतर्गत आहे, तुम्हाला ते परिवर्तित करते व तुम्ही इतके सुंदर होता। समजा, ज्यांनी टेलिव्हिजन पाहिला नाही, त्याला तो दाखविला तर तो म्हणेल ती पेटी आहे. तुम्ही म्हणाल की त्यामधे फिल्म पाहता येते, तर त्याच विश्वास बसणार नाही, कारण तो अज्ञानी आहे. जेव्हा तुम्ही मेन्सला तो जोडाल व तो पाहिल, तेव्हां त्याचा विश्वास बसेल. त्याचप्रमाणे मला तुम्ही सर्व किती महान व श्रेष्ठ दिसत आहात। सहजयोगात वाईट लोक सापडत नाहीत. ते कमालीचे प्रामाणिक आहेत, कधी खोटे बोलत नाहीत. त्यांना काही सांगायचे नसेल तर ते गप्प बसतात. ते अतिशय जागरूक, कार्यक्षम व दयाळू आहेत. सर्वच एखाद्या चक्रीवादळां सारखं आहे. जेव्हां तुम्ही बदलतां तेव्हा सर्व ठिकाणी बदल घडून यायला सुरुवात होते. पूर्व युरोपीय देशांतील लोकांना मी जागृति दिल्यावर ते त्यांच्या देशांत गेले व तिकडे बदल घडून यायला सुरुवात झाली. याची सुरुवात तुम्ही केली आहे. कारण हे कृत युग आहे व ते कार्यान्वित होणार आहे. हे सर्व तुम्ही स्वीकारलं आहे, त्या बद्दल मी तुमची ऋणी आहे.

आईचं प्रेम निर्व्याज असलं तरी या आईच्या तुमच्याकडून काही अपेक्षा आहेत. या जगामधे आपल्याला परिवर्तन करायचं आहे. आपल्याला स्वतःच्या गहनतेमधे उतरायचं आहे, इतकंच, जितके गहनतेत तुम्ही उतराल, तितकं ते चांगलं आहे. जेवढं पात्र मोठं तेवढी त्यांत ईश्वरी शक्ति जास्त ओतली जाईल. म्हणून आपल्याला ध्यान करुन गहन व्यक्ति झालं पाहिजे. आपल्याला स्वतःसाठीच हे करायचे आहे. या जीवनांत तुम्ही जन्म घेतला आहे.

म्हणून करायचं आहे. तुमच्यावर ही फार मोठी जबाबदारी आहे. कारण तुम्ही यावेळी इथे आहात. संपूर्ण मानव जातीमध्ये परिवर्तन होण्याची महान घटना घडत असताना तुम्ही जन्म घेतलां आहे ही किती महान गोष्ट आहे व त्यात तुम्ही सहभागी आहांत. म्हणून तुमच्या पुण्याईत किती महानता असली पाहिजे. आणि तुम्ही याच्यां हृदयापासून स्विकार केला आहे व तुम्ही ती कार्यान्वित करीत आहात. तुम्हांला वाटत असेल श्री माताजी आम्ही फक्त आनंदात आहोत. खरं म्हणजे गहनतेत उतरला आहात म्हणून तुम्ही आनंदात आहात. तुमच्या गहनतेतून आलेलं तुमचं व्यक्तिमत्व इतर मानवजाती मध्ये परिवर्तन घडविण्याची सुरुवात करेल व त्या माणसांना कळेल की ते परमेश्वरी राज्यांत आले आहेत व हे सर्व तुमच्यामुळे होणार आहे माझ्यामुळे नाही. आणि म्हणून गहनता हवी. मी निरिच्छ व्यक्ति आहे. तुम्ही याची इच्छा करायला हवी व सर्व जगाकरिता याची सुरुवात करायला हवी.

पुन्हा मी तुमची आभारी आहे व एक नम्र विनंती करते की शपथ वगैरेची आवश्यकता नाही - कारण ती पण संवत आहे - सहजयोगात शिस्तीचं बंधन नाही. स्वतः समजून घेणं आहे, की तुम्ही अशा वेळी जन्मलां आहांत की सूक्ष्म परंतु कार्यक्षम असं महान परिवर्तन करण्याचं महत्वाचं कार्य करणं आवश्यक आहे व ते घडून येत आहे. परमेश्वराचे तुम्हा सर्वांना आशिर्वाद, जास्तीत जास्त ध्यान करा व स्वतःच्या जाणीवेत रहा. आपल्याला हे महान कार्य करायचे आहे. सर्वात उच्च प्रकारची ही उत्क्रांत आहे. बदल व जनपरिवर्तन करावयाचे आहे. एक गोर्बाचिव्ह पुरणार नाही. अशा अनेकांची आवश्यकता आहे आणि आपण ते घडवून आणणार आहोत.

परमेश्वराचे तुम्हाला अनेक आशिर्वाद

## वाढदिवस पुजेच्या वेळचे भाषण

दिल्ली
30/3/1990

आज नवरात्रीची चतुर्थी आहे. आणि नवरात्रामध्ये रात्री पुजा झाली पाहिजे. अंधःकार दूर करण्यासाठी रात्रींतच प्रकाशाला आपण आणणे अत्यावश्यक आहे. आजच्या दिवसाचा एक आणखी संयोग आहे की आपण लोक आमचा जन्मदिन साजरा करीत आहात. आजच्या दिवशी गौरीजींनी आपल्या विवाहानंतर श्री गणेशाची स्थापना केली. श्री गणेश पावित्र्याचे स्त्रोत आहेत. सर्वप्रथम या जगामध्ये पवित्रता पसरवली गेली. ज्यामुळे जे प्राणी किंवा जे मनुष्य या विश्वात आले ते पावित्र्यामुळे सुरक्षित रहावे आणि अपवित्र गोष्टींपासून दूर रहावे, यासाठी सा-या सृष्टीला गौराजींनी पवित्रतेने न्हाऊन काढले. आणि त्यानंतरच सा-या सृष्टीची रचना झाली.

तर, जीवनामध्ये आपल्यासाठी सर्वात महत्वपूर्ण कार्य हे आहे कीं, आपण आपल्यामधील पावित्र्याला सर्वात उच्च गोष्ट समजणे. पण पवित्र याचा अर्थ असा नव्हे की आंघोळ करून - शूचिर्भूत होऊन, सफाई करून आपल्या शरीराला ठीक करणे, तर आपल्या हृदयाला स्वच्छ केले पाहिजे. हृदयाचा सर्वात मोठा विकार आहे क्रोध. आणि जेव्हा मनुष्य क्रोधात येतो तेव्हा जे पवित्र आहे ते नष्ट होऊन जाते. कारण पावित्र्याचे दुसरे नाव आहे निर्व्याज प्रेम. ते प्रेम जे सतत वहात असते आणि कशाचीही इच्छा करीत नाही. त्याची तृप्ती यांतच आहे की, ते सतत वाहत आहे. आणि ज्यावेळी ते वहात नाही, त्यावेळी ते चिंतीत {अस्वस्थ} होते. तर पवित्र याचा अर्थ असा की आपण आपल्या हृदयाला प्रेमाने भरून टाका. क्रोधाने नव्हे. क्रोध आपला शत्रू आहे. पण तो विश्वासाचा शत्रू आहे. जगांत जेवढी युध्दे झाली, जेवढी हानी झाली, ते सर्व सामुहिक क्रोधाचे कारण आहेत. क्रोधासाठी बहाणे अनेक असतात. मी अशासाठी नाराज झालो कारण असे होते( प्रत्येक क्रोध कोणते तरी कारण शोधू शकतो. परंतु

युध्दासारख्या भयानक गोष्टीसुध्दा क्रोधापासून उपजतात. त्यांच्या मुळांमध्ये हा क्रोधच असतो. जर हृदयामध्ये प्रेम असेल तर क्रोध येऊ शकत नाही. आणि क्रोधाचा देखावा असेल, तर तो प्रेमासाठीच. एखाद्या दुष्ट राक्षसाचा जेव्हा संहार केला जातो, तो सुध्दा त्याच्यावर प्रेम केल्यामुळेच होतो. कारण तो या योग्यतेचाच असतो की, त्याचा संहार झाला पाहिजे, ज्यायोगे तो आणखी पापकर्म करणार नाही. पण हे कार्य मानवासाठी नाही. हे तर देवीचे कार्य आहे, जे त्यांनी ह्या नवरात्रामध्ये केले.

तर, हृदयाला विशाल करून हृदयांत असा विचार करा की आम्ही कोणावर असे प्रेम करतो जे निर्वाज्य, निर्मम आहे, ज्याबद्दल आमच्यामध्ये असे नाही की हा माझा मुलगा, माझी बहीण आहे, माझे घर, माझी वस्तू. मनुष्याची जी स्थिती आहे त्यापेक्षा आपण खूप उच्च स्थितीला आला आहात कारण आपण सहजयोगी आहात. आपला योग परमेश्वराच्या या प्रेमाच्या सुक्ष्म शक्तिशी झाला आहे. ही शक्ति आपल्या आंतमध्ये अविरत वहात आहे. आपल्याला पल्लवित करीत आहे. आपल्याला संभाळते आहे. आपल्याला तर उठवते आहे. वारंवार आपल्याला प्रेरित करते आहे. आपल्याला आल्हाददायी मधुमय प्रेमाने भरून देत आहे. अशा सुंदर शक्तिशी आपला योग झाला. परंतु आता आमच्या हृदयांत त्याच्यासाठी कितीसे स्थान आहे हे पाहिले पाहिजे. आपल्या हृदयांत आईसाठी तर प्रेम आहे. आणि त्या प्रेमासाठी आपण लोक खूप आनंदात आहात. पण अजूनही दोन प्रकारचे प्रेम असले पाहिजे. तरच आईचे पूर्ण प्रेम असू शकते.

एक प्रेम स्वतःविषयी, की आम्ही सहजयोगी आहोत. आम्ही सहजयोगामध्ये शक्ति प्राप्त केली. पण आम्ही याला कशा प्रकारे वाढविले पाहिजे. अनेक लोक सहजयोगाच्या प्रसारासाठी पुष्कळ कार्य करतात. {हॉरिझॉन्टल मूव्हमेंट} समांतर चलन, पृथ्वि प्रमाणे चारी बाजुला वाढणारे. ते लोक स्वतःकडे दृष्टी फिरवीत नाहीत. तर जे उर्ध्वगामी चलन आहे, त्याला उत्थानाची गति मिळत नाही. बाहयामध्ये ते पुष्कळ कांही करू शकतात. बाहयामध्ये ते धांवतील, काम करतील, सर्वांना भेटतील. पण आंतल्या शक्तिला वाढवू शकीत नाहीत.

असेही अनेक लोक आहेत जे आंतल्या शक्तिकडे खूप लक्ष देतात. आणि बाहेरच्या शक्तिकडे नाही. तर त्यांच्यामध्ये संतुलन येत नाही. आणि ज्यावेळी लोक बाहयाच्या अंगामध्ये जास्त वाढू लागतात तेव्हा त्यांच्या आतील शक्ति क्षीण होऊ लागते. आणि असे होत होत अशा कडेला पोहोचते की, लगेच अहंकारामध्ये बुडू लागतात, की आम्ही सहजयोगाचे एवढे कार्य केले आहे, इतकी मेहनत घेतली आहे, नंतर अशा लोकांचे एक नवीन जीवन सुरू होत, जे सहजयोगासाठी अजिबात उपयुक्त नाही. ते स्वतःबद्दल विचार करतात की आमचे खूप महत्व असले पाहिजे. सेल्फ-इंपॉर्टन्स. प्रत्येक गोष्टीमध्ये ते स्वतःचे महत्त्व दाखवतील. आपले विशेषत्व दाखवतील. स्वतःला पुढे करतील. पण आतून खिळखिळीतपणा आला आहे. मग त्यांना काही आजार झाला, वेडेपणाची लहर आली, काही मोठे संकट आले की मग असे म्हणतात की, "माताजी आम्ही तर आपल्यावर स्वतःला पूर्णपणे समर्पित केले होते. मग असे कसे झाले{ याची जबाबदारी आपल्यावरच आहे. की आपणच बहकलात. मग असा माणूस एकतर्फी होऊन जातो. तो दुसऱ्याशी संबंध करू शकत नाही. त्याचा संबंध फक्त लोकांवर रूबाब पाडण्यात असतो. आणि स्वतःला उच्च दाखवणे, सर्वात पुढे आले पाहिजे, सगळ्यात त्यांचं महत्त्व असले पाहिजे. तर मग असेही होऊ शकते की ते विसरून जाऊ शकतात की श्री माताजीना सुध्दा काही करावयाचे आहे. त्यांना सुध्दा काही दान द्यावयाचे आहे. मी पाहिले की, राहुरी मुंबईतसुध्दा कशा प्रकारचे असे लोक एकदम उठून वर आले. आणि ते स्वतःला खूप महत्वपूर्ण समजू लागले. मग तिथे आरती होत नव्हती. फोटो पुसला जात नव्हता तरी बरं आपले फोटो नाही लावले। आपलेच घोडे पुढे दामटत. कोणाला काही विचारायचं नाही. आपण करणार{ मग भांडणे सुरू झाली ग्रुप्स तयार झाले.

कारण ज्या सूत्रामध्ये तुम्ही बांधले गेले आहात ते तुमच्या आईचे सूत्र आहे. आणि त्याच सूत्रामधे आपण बांधले रहा. आणि पूर्ण वेळ हे समजून घ्या की आपण एकाच आईची लेकरे आहोत. आमच्यामध्ये ना कोणी उच्च ना नीच ना, आम्ही काही कार्य करतो. आणि हे चैतन्यच सर्व कार्य करते. आम्ही कांही करतच नाही. ही

भावना जेव्हा सुटते की आम्ही मोठे आहोत, आम्ही हे केले, आम्ही ते करुं, हें करुं, तेव्हा परम चैतन्य म्हणते, तुला जे करायचे आहे ते कर, जेथे जावयाचे आहे तेथे जा हवे तर नरकात जा, हवे तर स्वतःला नष्ट कर. स्वतःचा सर्वनाश कर ते आपल्याला थांबवणार नाही कारण आपल्या स्वातंत्र्याला ते मानते. आपल्याला स्वर्गात जायचे असेल तर त्याचीही व्यवस्था आहे.

पण सहजयोगामध्ये एक आणखि मोठा दोष आहे आपण एक सामूहिक विराट शक्ती आहोत. आपण एकटे नाही. सर्व एकाच शरीराचे अंग-प्रत्यंग आहोत. त्यामध्ये जर कोणी एक असा झाला किंवा दोनचार असे झाले जे आपला ग्रुप तयार करतील तर ज्याप्रमाणे कॅन्सरची मॅलिग्नन्सी असते, की एकच पेशी वाढू लागते, वेगळ्या प्रकारे. त्याप्रमाणेच एक व्यक्ति वाढून सा-या सहजयोगाला ग्रासू शकते. आणि आपली सारी मेहनत व्यर्थ जाते. आपल्याला तर सागरापासून शिकले पाहीजे, जो सर्वात खाली असतो, सर्व नदयांना आपल्यामध्ये सामावून घेतो. आणि स्वतःला तापवून घेऊन वाफ तयार करुन सा-या दुनियेवर पावसाचे वरदान पाठवितो. त्याची जी नम्रता आहे तीच त्याच्या गहनतेचे लक्षण आहे. परत तीच वर्षा नदयांमधून धावत जावून त्याच समुद्राकडे जाते. जेव्हा आपल्यामध्ये अत्यंत नम्रता व प्रेम येईल तेव्हाच आपण या समुद्राप्रमाणे विशाल होऊं. पण आपलेच महत्व करायचे, आपलेच विशेष समजायचे, यामुळे सर्वात वाईट गोष्ट ही की परमचैतन्य आपल्याला सांगून टाकेल की जा. मग आपण एका बाजुला फेकले जाल, ती माझ्यासाठी दुःखकारक गोष्ट असते. असे लोक जे विचार करतात की आम्ही हे कार्य केले, ते कार्य केले, त्यांनी पटकन मागे होऊन पाहिले पाहीजे, की आम्ही ध्यान करतो का? आमचे ध्यान लागते का? आम्ही किती गहनतेमध्ये आहोत? आम्ही कशाकशावर प्रेम करतो, किती जणांवर प्रेम करतो, आणि किती जणांशी दुष्मनी करतो. सहजयोगामध्ये काही लोक खूप गहनतेत आहेत. काही अजून किना-यावरच डोलताहेत. आणि ते कधी फेकले जातील ते सांगू शकत नाही.

मी आपल्याला आधीच सांगितले आहे की एकोण्णीसशे नव्वद {1990} नंतर एक नवीन दालन उघडणार आहे. आणि एक नवीन उडी आपल्याला मारायची आहे. ज्याने आपण या नवीन मोहोळात उतरुन त्या नव्या गोष्टीला पकडू शकाल. सहजयोगाची प्रगति वीस वर्षांची होणार आहे. आणि यात टिकून रहाण्यासाठी पहिली गोष्ट आपल्या आतमध्ये पवित्र झाले पाहीजे. जे नम्रतेने भरले आहे. जर आपण एकदम स्वच्छ आणि पवित्र असाल तर आपल्याला कोणालाही शिवून, कोणाशीही बोलून अपवित्रता येणार नाही. कारण आपण प्रत्येक गोष्टीला शुध्द करता. आपला स्वभावच शुध्द करण्याचा आहे. आपण ज्याला भेटाल त्याला शुध्द करीत जाल. त्यात घाबरण्याची काय गोष्ट आहे? त्यात दुस-याला धिक्कारण्याची काय गोष्ट आहे? तर मग आपली पवित्रता कमी आहे. जर आपली पवित्रता संपूर्ण आहे तर, त्या पवित्रतेध्ये सुध्दा शक्ति व तेज आहे. आणि ती इतकी शक्तिशाली आहे की कोणत्याही अपवित्रतेला खेचून घेऊ शकता. जशी प्रत्येक प्रकारची गोष्ट समुद्रामध्ये एकाकार होऊन जाते.

आता दुसरे लोक आहेत जे फक्त स्वतःच्या प्रगतिचा विचार करतात. ते असा विचार करतात की, आम्हाला दुस-याशी काय कारण? आम्ही आमच्या खोलीत बसून श्री माताजींची पुजा करतो. आम्ही त्यांना मानतो आमचा दुनियेशी काही संबंध नाही. आणि दुस-यापासून वेगळे रहातात. असे लोक होत नाहीत कारण आपण एका शरीराचे अंग-प्रत्यंग आहोत. मग आपण म्हणाल, "माताजी मी इतकी पुजा करतो, इतके मंत्र म्हणतो, इतके काम करतो मग माझी अशी स्थिती का? कारण आपण त्या सामुहिक शक्तिपासून दूर गेलात. सहजयोग सामुहिक शक्ति आहे. तेव्हा दोन्ही गोष्टी कडे लक्ष दिले पाहीजे. की आपण आपली शक्ति संभाळणे आणि सामुहिकता घडवत जाणे. तरच आपल्यामध्ये पूर्ण संतुलन येईल.

मी असे लोक पाहिले आहेत, ज्यांनी सहजयोगासाठी खूप कार्य केले, बरेच चांगले बोलत होते, भाषण देत होते. आणि आपल्या भाषणाची टेप तयार केली. मग लोकांना सांगू लागले, आपण माझी टेप ऐका. मग लोक आमची टेप सोडून त्यांची टेप ऐकू लागले. त्यांची अशी स्थिती झाली की ते आमच्या फोटोला तर नमस्कार करायचे पण आम्हाला नाही. कारण त्यांना फोटोची सवय झाली होती. मग त्यांनी स्वतःचे फोटो छापले. आणि

फोटो सर्वांना दाखवूं लागले. अशा प्रकारे आपलेच महत्त्व वाढवूं लागले. करतां करतां अशा खड्डयात पडले आणि मग सुटून गेले सहजयोगातून, असे लोक का निघाले? कारण संतुलन नाही. आणि संतुलन नसल्यावर माणूस उजवीकडे किंवा डावीकडे जातो.

दोन प्रकारच्या शक्त्या आपल्या आंतमध्ये आहेत. ज्यायोगे आपण सहजयोगाकडे खेचलेही जातो. आणि दुसरी शक्ति ज्यामुळे आपण बाहेर फेकले जातो. बरं, परत लोक कमी झाले. तर यामध्ये सहजयोगाचे नुकसान तर झाले नाही. यामध्ये त्यांचेच नुकसान झाले. जर आपल्याला फायदा करून घ्यायचा आहे तर या गोष्टीला समजून घ्या की सहजयोगाला आपली गरज नाही. आपल्याला सहजयोगाची गरज आहे.

"योग" याचा दूसरा अर्थ होतो युक्ति. एक तर आहे की संबंध जोडला जाणे, दुसरा आहे की युक्ति. पहिली तर युक्ति ही की आम्हाला याचे ज्ञान झाले पाहीजे. ज्ञानाचा अर्थ बुध्दी नव्हे. युक्ति म्हणजे, आमच्या बोटांमध्ये, हातामध्ये, आंतमध्ये कुंडलिनीचे पूर्णपणे जागरण होणे हे ज्ञान आहे. मग आणखी सुध्दां ज्ञान होऊ लागते. या ज्ञानामुळे आपण लोकांची कुंडलिनी जागृत करू शकतो. त्यांना समजावूं शकतो. त्यांच्याशी पूर्णपणे आपण एकाग्र होऊ शकतो. त्यांच्याशी आपण वार्तालाप करू शकतो. तर आपल्याला यामुळे बोध्दिक ज्ञानसुध्दा येते. आपल्याला सहजयोग समजतो. नाही तर आधी कोण समजूं शकत होते? कबीर, नानकजींच्या गोष्टी कोणी आधी समजूं शकत होते का? आपले बुध्दिचातुर्य वाढते. अगम्य गोष्ट गम्य होते.

दुसरी युक्ति काय आहे? ती ही की आपण आमच्यावर भक्ति करतां. ती भक्तिसुध्दा जेव्हां तुम्ही करतां तेव्हा अनन्य भक्ति करता. तादात्म्यामध्ये आपण आमच्याशी जोडले जाता. जसे आम्हाला वाटले तसेच आपल्याला वाटूं लागते. आज उशीर झाला तर आम्ही सुध्दा असे सांगूं शकतो की आम्ही खूप थकलो. आमच्याने होणार नाही. पण आम्ही असा विचार केला नवरात्री आहे, रात्रींत करावे आणि तोच मुहूर्त आम्हाला मिळवयाचा होता. तर आम्हाला करायचेही आहे आणि अत्यंत आनंदात आम्ही करीत आहोत. आम्ही थकलो आहोत, आरामही केला नाही असा विचारही आम्ही करीत नाही. आणि आपल्याला सुध्दा असा विचार केला पाहीजे की हीच वेळ श्री माताजींनी ठरविली आहे. कारण हीच वेळ आमच्यासाठी उचित आहे. पुजेसाठी. पण अर्धेअधिक लोक उल्टया गोष्टींचा विचार करतील. आम्ही सकाळपासून बसलो आहोत. आम्हाला भूक लागली, मुले झोपली असतील. तर ती अनन्य भक्ति नाही. कारण माझा जो विचार आहे, तो आपल्या विचारामध्येच आहे. कोणासाठी मी विचार करते जर श्री माताजी हे इतके खराब आहे, असे आहे. मी म्हणते, "नाही हो, एकदम चांगले आहे." मी विचार करते, मी जे बघूं शकते ते हे का बघू शकत नाहीत. तर मग अनन्य नाही झाले, अन्य झाले, दुसरे झाले.

अशा त-हेने जसे तुमच्याबद्दल आमचे प्रेम आहे. आपणही सर्वांबद्दल तसेच प्रेम जोपासा. जर ही गोष्ट आपल्यामध्ये नाही तर ते अन्य आहे, अनन्य नाही. जर आमच्याच शरीराचे अंग-प्रत्यंग आहे तर जसे आम्ही आहोत तसेच त्यांना झाले पाहीजे. जसा आम्ही विचार करतो तसाच विचार आपल्याला केला पाहीजे. तर हे वेगळा विचार कां करतात? उल्टया गोष्टींचा विचार कां करतात? जे विहीरींत आहे तेच घडयामध्ये यायला पाहिजे हेच प्रेमाचे स्त्रोत आहे. दुसरी गोष्ट कशी येऊ शकेल? आणि जेव्हा दुसरी गोष्ट येते तेव्हा मी विचार करते की त्यांनी आणि कोणत्या दुस-या विहीरीतले पाणी भरले आहे. हा घडा माझा नाही.

आतां दुसरी गोष्ट म्हणजे श्री माताजी आम्ही आपल्याला शरणागत आहोत. जर तुम्ही शरणागत आहात तर आम्ही तुम्हाला काही सांगीतले, किंवा कोणतीही गोष्ट समजाविली, किंवा आपल्यासमोर कोणताही प्रस्ताव ठेवला, कांही ठेवले, तर त्याला नाकारण्याचा प्रश्नच कसा उद्भवेल? पण आपण आणि आम्ही एक झालो तर त्यांचा प्रश्नच कसा उठेल? श्री माताजींनी सांगीतले ते सांगीतले, आम्ही "श्री माताजी" च झालो तर आम्ही नाही कसे म्हणू शकणार? तर आपल्यामध्ये हे तादात्म्य नाही आले, तर ही दुसरी युक्ति आहे की "श्री माताजी, माझ्या हृदयांत आपण या. माझ्या बुध्दिमध्ये आपण या. माझ्या विचारांमध्ये आपण या. माझ्या जीवनाच्या प्रत्येक कणामध्ये आपण

या. आपण जिथे सांगाल तिथे आम्ही हजर आहोत. हात जोडून." पण आपल्याला सांगावं तर लागेल ना! आणि पूर्ण हृदयासह, कुठल्या मतलबाने, कारणाने नाही.

तिसरी गोष्ट. आम्ही हे काम करतो आहोत. आम्ही सहजयोगाचे हे काम केले. आम्ही ही सजावट केली. ठीक ठाक केले. मी केलं, तर सहजयोगी आले नाहीत. सहजयोगामध्ये आपले सर्व कर्म "अकर्म" झाले पाहिजे. जेव्हा आपण सूक्ष्मतरामध्ये पहाल, तर आपण पहाल, कीं काय, मी असा विचार करतो कां, कीं मी केलं. अशी गोष्ट माझ्या मेंदूत येतेच कशी? याचा अर्थ माझा योग पुरा झाला नाही. जेव्हा योग पूर्ण होतो तेव्हा तुम्ही अकर्मात उतरता. जसे हे घडत आहे, ते घडत आहे, अशा तऱ्हेने आपण बोलू लागता. तेव्हा आपल्याला पूर्णपणे तादात्म्य प्राप्त झाले.

तिसरी युक्ति जी शिकली पाहिजे ती अशी जिथे मी काही करीत आहे, मी काय करीत आहे, जो पर्यंत आपण आपले कार्य शोधित होता तो पर्यंत आपण काही करत होता, कारण आपल्यामध्ये अहंभाव होता. जेव्हा आपण सामुदायिकतेमध्ये आलात तेव्हा आपण कांही करीत नसता. आपण अंग-प्रत्यंग आहात आणि ते कार्य होत आहे.

या युक्या मी यासाठी सांगते आहे, कारण की - जी ग्रेप घ्यायची आहे! याप्रकारे नेहमी आपण आपले विवेचन करावे. आणि स्वतःकडे दृष्टी टाकून पहावे की, मी कार्य विचार करतो आहे, मी दुसऱ्यासाठी काय विचार करतो आहे. ते माझ्यापेक्षा श्रेष्ठ आहेत. त्यांच्याकडून मला शिकले पाहिजे. त्यांचे चांगले गुण दिसतात की फक्त वाईटच गुण दिसतात. दुसऱ्यांचे चांगले गुण दिसत असतील आणि स्वतःचे वाईट गुण तर फार चांगली गोष्ट आहे. ही युक्ति समजून घेतली पाहिजे, की यात आम्ही डामडौलात आहोत तर ते स्वतःमुळेच आहोत. सहजयोग तर खूपच महान गोष्ट आहे. पण आमच्यामध्ये जो वाईटपणा येत आहे, किंवा त्याची मजा पूर्णपणे आम्ही लुटू शकत नाही, याचे कारण आमच्यामध्ये कांही ना काही दोष आहे. या युक्तिला जर आपण व्यवस्थितपणे केले, तर फक्त आनंद मिळेल. निरानंद. आणि कांही नाही. आणि मग पाहिजे तरी काय? आपले रूपच बदलून जाईल.

आणि आज या जन्मदिनी मी इच्छा करते की, आपले जन्मदिनसुध्दा साजरे व्हावे. आजपासून आपण या युक्या समजून घ्याव्या, आणि स्वतःला अशा पावित्र्याने ओतप्रोत करा जसे काही श्री गणेश! आणि पवित्रते मुळे माणसामध्ये सुबुध्दी येते. कारण पवित्रता प्रेमाचेच नाव आहे. सुबुध्दीचा अर्थ प्रेमच आहे. सर्व गोष्टींचा अर्थ प्रेम आहे. आणि जर आपण सुबुध्दी प्राप्त करू शकत नाही, आणि प्रेमाला आपलेसे करू शकत नाही तर सहजयोगात येऊन आपला वेळ व्यस्त करणे आहे. या वेळी अशी कांही वेळ घटीत होते आहे की सर्वांना यामध्ये सामावून गेले पाहिजे. आणि स्वतःला परिवर्तनामध्ये घातलेच पाहिजे.

परिवर्तित आपल्याला झालेच पाहिजे. वाईट गोष्टी आमच्यामध्ये आहेत. आम्हाला स्वतःला पूर्णपणे पवित्र करावयाचे आहे. या परिवर्तनाचे फलस्वरूप आशिर्वाद आहे — ते जीवन, ज्याचे वर्णन केले जाणे अशक्य - जे कबीरांनी सांगीतले -

"अब मस्त हुए, फिर क्या बोले।"

तर आपण त्या आनंदामध्ये या. त्याला प्राप्त करा. त्या आनंदामध्ये आनंदित व्हा. हा माझा आशिर्वाद आहे.

आदिशक्ति पुजा कलकत्ता 9/4/1990

कलकत्त्यातील तुम्हां लोकांची प्रगति पाहून खूप आनंद झाला. आणि या शहरामध्ये अनेक लोक खूप गहन साधक आहेत हे मी जाणते. त्यांना अजून समजले नाही की, अशी वेळ आली आहे की ज्याला ते शोधत आहेत ते त्यांना मिळणार. तुम्हा लोकांना त्यांच्यापर्यंत पोहोचले पाहीजे. आणि अशा लोकांचा शोध घेतला पाहिजे, जे सत्याला शोधित आहेत. यासाठी आपला विस्तार चारी बाजूंना करणे आवश्यक आहे. पण त्याबरोबरच आपल्याला आपली शक्तिसुध्दा वाढवली पाहीजे. आपले जीवनसुध्दा परिवर्तित केले पाहीजे. आपले जीवन सुध्दा एका अतूट ज्योतीप्रमाणे प्रज्वलित केले पाहिजे. ज्याला पाहून लोक ओळखतील ही काही विशेष व्यक्ति आहे. ध्यानधारणा करणे खूप जरूरीचे आहे.

कलकत्ता एक फार गजबजाटाचे शहर आहे. आणि याच्या गजबजाटामध्ये मनुष्य बुडून जातो. त्याला वेळ कमी मिळतो. हा जो वेळ आपण आपल्या हातामध्ये राखला आहे. तो फक्त उत्थानासाठी व आपल्या आंतील प्रगतिसाठी आहे. आपल्याला जर आतून स्वतःला पूर्णपणे जाणून घ्यावयाचे असेल तर आपण थोडा वेळ रोज त्यासाठी ध्यानधारणा करणे आवश्यक आहे. संध्याकाळी आणि सकाळी थोडा वेळ. त्यामध्ये जे करतात व करीत नाहीत त्यामध्ये पुष्कळ फरक येतो. विशेषतः जे लोक बाहेरील खूप कार्य करीत आहेत, आणि सहजयोगासाठी खूप मेहनत घेत आहेत. इकडे तिकडे फिरत आहेत, लोकांशी गप्पागोष्टी करीत आहेत. लेक्चर्स देतात, समजावतात. त्यांची जी रूहानी शक्ति आहे, जी दैवी शक्ति आहे ती हळूं हळूं कमी होत जाते. त्यासाठी अशा लोकांनी ध्यानधारणा जरूर करणे जास्तच आवश्यक आहे.

आणि झोपण्यापूर्वी थोडा वेळ ध्यान करा. आणि सकाळी आंघोळ केल्यावर थोडा वेळ ध्यान करा, हे पुरेसे आहे. पण जेव्हां ध्यान करता त्यावेळी आपले ध्यान नीट झाले हे कसे ओळखणार? ध्यान करताना आपल्याला निर्विचारिता प्रस्थापित केली पाहीजे. त्यावेळी आपल्याला "हे नाही", "हे नाही", "नेति", "नेति" या त-हेने आपल्या विचारांना परत पाठवले पाहीजे. असे करतां करतां पहिला श्वास घेतांना आपल्याला आपल्यामध्ये निर्विचारिता आलेली दिसून येईल. अर्थात फोटो समोर ठेवला पाहीजे, आणि त्याच्यासमोर दिवा लावून पाय पाण्यात ठेवून बसले पाहीजे. ज्या वेळी निर्विचारिता येईल आणि दोन्ही हातामध्ये चैतन्य वाहू लागेल तेव्हां आपण पाय पुसून जमीनीवर ध्यानामध्ये बसावे. ध्यानामध्ये बसून ध्यानामधील गहनता आपण समजून घ्या. मग विचार येणे सुरू झाले तर त्यांना पर सांगायचे, "हे नाही", "हे नाही", किंवा क्षमा, "क्षमा". थांबू शकतात. जर शांती नसली तर आपली अंतर्यामीची प्रगति कशा प्रकारे हाऊ शकेल? ज्याप्रमाणे भूकंप येत आहे, तर भूकंपामध्ये कोणत्याही झाडाची प्रगति होऊ शकत नाही. तर त्यावेळी मनुष्य एका विचारांच्या जाळ्यात अडकला असतो त्यावेळी त्याची प्रगति होणे असम्भव असते. त्यामुळे त्यावेळी आपल्याला शांत, स्थित करणे आवश्यक असते. त्यासाठीसुध्दा दोन मंत्र आहेत. ज्यामुळे आपल्यामध्ये प्रथम शांती प्रस्थापित होते. हळूंहळूं आपल्याला आश्चर्य वाटेल, हे सर्व प्रयास करण्याची जरूरच पडणार नाही. आपण एकदम निर्विचार व्हाल. तसेच कोणतीही सुंदर किंवा कलात्मक वस्तु पाहून आपण एकदम निर्विचार व्हाल. हळूं हळूं ही संवय वाढत जाईल. आणि जसजशी वाढेल तसतशी आपली आंतली प्रगति होत जाईल. आपण एका दालनामध्ये आलात, पण आणखी दालनामध्ये सुध्दां आपल्याला जावयाचे आहे. आणि स्वतःला समजावून घ्यायचे आहे. यासाठी ध्यानधारणेने गहनेत उतरणे आवश्यक आहे. याची ओळख ही की, जेव्हां आपण ध्यानधारणेतून उठाल, त्यावेळी आपल्याला मनाला उठावे, असे वाटत नसेल. थोडा वेळ परत तुम्ही त्याच ध्यानामध्ये दंग असाल. आपल्याला असे वाटत असेल की, आपल्याला खूप आनंद मिळतो आहे. एकदम आपण उठू शकत नाही.

जर ध्यानधारणेनंतर आपण स्वतःचे चित्त कुठल्या दुस-या गोष्टीकडे घेऊन जात असाल, जसे, जेवायचे आहे, झोपायचे आहे, किंवा बाहेर जायचे आहे तर समजा, की ध्यान लागले नाही. कारण ध्यानातून सुटणे थोडेसे

कठीण असते. याप्रकारे हळू हळू आपली आंतली प्रगति होत राहील. आणि जेव्हां आपण बाह्यांत कार्य कराल, तेव्हां आपल्याला आश्चर्य वाटेल की आपली शक्ति क्षीण होत नाही, उलट वाढते आहे. असे पाहिले गेले आहे की जे लवकर पार झाल्यावर दुस-यांना जागृति देऊ इच्छितात आणि त्यांच्या पकडेत येतात. खरे तर {कॅचेस} पकड नसते. ज्याप्रमाणे कोणत्याही बॅरोमीटर मध्ये किंवा यंत्रामुळे आपण समजू शकता की इथे पूर निघत आहे किंवा इथे प्रकाश आहे, त्याप्रकारे आपण आपल्या आंतमध्ये समजू शकतो. [एक प्रकारचा निर्व्याज स्वभाव झाला पाहीजे म्हणजे अलिप्तता आली पाहीजे. मग आपल्याला पकड येणार नाही. तुम्ही कितीही लोकांवर हात फिरवा, कितीही जणांना जागृति द्या, कांहीही कार्य करा. कितीही रोग ठीक करा. आपल्यामध्ये त्याचा कांही परिणाम होणार नाही. पण ही दशा आल्याशिवाय जर आपण लोकांना हातात घेऊं लागलों तर मुश्किल होईल.]

दुसरी गोष्ट अशी की, आपण लोक पार झाला आहांत, आपण खूप उच्च स्थितीप्रत आला आहांत. मोठया अडचणीनंतर ही गोष्ट होते. तर आपल्याला असे लोक भेटतील जे आत्ताआत्ताच सहजयोगात आले आहेत. हे समजून घेतले पाहिजे की, आत्ता आले आहेत आणि आत्ताच कुठली आक्रमक गोष्ट करता कामा नये. आपल्या प्रेमाने, खूप कटाक्षाने, सांभाळून, जमेल तर काही खाण्यापिण्याची व्यवस्था करा. ज्यायोगे ते लोक आपल्याला इतके 'भयंकर काही' समजणार नाहीत. कारण साधुसंत लोक तर हातामध्ये दांडका घेऊनच बसतात{ त्याप्रमाणे झालं नाही पाहीजे. त्यांना हे समजले की, सर्व आपले भाऊबहिण आहेत. त्यामुळेच हे लोक जमू शकतात. आणि जरुती करुन मी पाहिलं आहे की, एखादेच लोक असे येतात सहजयोगात, की जे फार जास्त शिस्त शिकवतात. इथे उभे रहायचे नाही, असे करायचे नाही. खास सहजयोगात शिस्त काही नाही, कारण आपला आत्मा इतका प्रकाशवान आहे की, त्या प्रकाशात हळू हळू आपण स्वतःच स्वतःला पहातो. आणि मग हळू हळू आपण स्वतःवरच हसू लागतो. ज्याप्रमाणे आपल्याला आपली प्रगति मिळाली त्याप्रमाणे हळू हळू स्वतःची प्रगति प्राप्त करुन घेतील. हा प्रकाश स्वतःच्या व्यवहारावरपण पडतो. आणि दुस-याच्याही.

सहजयोगामध्ये साक्षी स्वरुप प्राप्त होते. साक्षी स्वरुप तत्वामध्ये आपण कोणत्याही गोष्टीला फक्त पहातो. त्याविषयी विचार करीत नाही. आपल्या आत त्याची काही प्रतिक्रिया येऊ नये. तर निरांजनाकडे पहा, म्हणजे कोणत्याही गोष्टीकडे पाहून त्याची प्रतिक्रिया होता नये. प्रतिक्रिया न होता त्या गोष्टीला फक्त पहाणे, ही सर्वात मोठी आनंददायी क्रिडा आहे. त्याबद्दल कसलीच लालसा नसते. जसा एक गालिचा आहे, जर त्याबद्दल विचारच येत राहिले की, जर हा माझा आहे तर, जळणार तर नाही, खराब तर होणार नाही, जर दुस-याचा असेल तर, केवढयाचा आहे, कुठुन घेतला, तर या विचारांमुळे त्याचा आनंद तर आपल्याला मिळालाच नाही. तर जसे निर्विचारतेमध्ये आल्यावर, ज्याप्रमाणे एक सरोवर एकदम शांत, त्यात एक लाटही नाही, तरंगही नाही, असे शांत आपले मनच जाईल, आणि त्या शांत मनात सरोवरामध्ये ज्याच्या चारी बाजुला सुंदर निसर्ग आहे, जो त्यामध्ये पूर्णपणे प्रतिबिंबित आहे आणि जो दिसतही आहे. असेच आपलेही मन होऊन जाते. एकदा एक साधक आमच्या पाया पडावयास आले आणि एकदम त्यांची कुंडलिनी जागृत झाली. दुस-या खोलीत जे लोक बसले होते, ते एकदम शांत झाले, कारण त्यांना एकदम जाणिव झाली की, श्री मातार्जीबरोबर जे आहेत त्यांच्यामधून चैतन्य लहरी वाहू लागल्या आहेत. त्या त्यांना समजल्या. त्यांनी त्यांना मिठी मारली, ते त्यांना ओळखतही नव्हते तरीही{ आणि सगळे आल्हादित झाले. या प्रकारे आपण जेव्हा सहजयोगीयांना भेटाल तेव्हा आपल्याला असं अनुभवाला येईल, जसे काही मी स्वतःलाच भेटतो आहे. नामदेव जेव्हा गोरा कुंभाराला भेटले तेव्हा त्यांनी म्हटले की, मी तर इथे निर्गुण बघायला आलो होतो. तो सारा निर्गुण साकार झाला आहे. या प्रकारची समजणूक, आणि जाणीव, एक संताची दुस-या संतासाठी असू शकते. आजपर्यंत तर माणूस द्वेष, ईर्षा यामध्येच राहात आहे, पण जेव्हा तो सहजयोगी बनतो तेव्हा, दुसरा सहजयोगी त्याला अशा प्रकारचा वाटतो की, "मला समजलेला जो निर्गुण होता, तो सगुणात उभा राहिलेला निर्गुण हा आहे." अशा प्रकारचे आपापसांमधील प्रेम जे आहे ते खूप सूक्ष्म, खूप गहन, खूप आनंददायी होऊन जाते.

आपल्याला हे समजून घेतले पाहीजे की, आपण खूप सूक्ष्म आणि खूप मजबूत धाग्यांनी बांधले गेले आहोत. आणि आपापसांतील प्रेम याहून मोठी आनंदाची कोणतही गोष्ट नाही. आता खूप लोकांच्यामध्ये अशी गोष्ट असते की, माझा मुलगा, माझी बहिण, माझा भाऊ, माझे घर, हे जे ममत्व आहे हे सुध्दा कापले पाहीजे. या ममत्वाला तर एकदम कमी केले पाहीजे. आणि यातून सुटल्यावरच आपल्यात एकदम जास्त आनंद येईल. "माझे" ही जी भावना आहे, ती आपल्याला आत्म्यापासून दूर करते. मी कोण आहे? मी आत्मा आहे. आणि जो म्हणेल हा माझा आत्मा आहे, तर तो सहजयोगी नाही. आत्मा आपल्या जागेवर एकटा उभा आहे. त्याचा "माझा" कोणी नाही. त्याचे तर फक्त परमेश्वराशी नाते आहे. आणि आपल्याहीसुध्दा असे नाते आहे, जसा झाडाच्या आत वहाणारा रस असतो, जो सगळ्यांना रस देतो पण कशालाही चिकटत नाही. "माझे" पण प्रेमाची हत्या आहे. आपण एक्त एका थेंबाने सागर होऊन जाता. या अमर्यादिततेमध्येच आनंद आहे. कारण आपण समुद्राबरोबर उठता आणि पडता. या प्रकारेच मनुष्य वर्तमानात येऊ शकतो. [जेव्हा ममत्व सुटते तेव्हा आपल्या आंत एक मोठे आंदोलन होते. ज्यामुळे आपण अत्यंत शक्तिशाली बनता. आणि तीच शक्ति कार्यान्वित होते. आणि तीच सामुहिकतेमध्ये खूप महान कार्य करणारी आहे आणि सा-या जगाचा उध्दारसुध्दा त्याच शक्तिमुळे होऊ शकतो.]

एक नवी यात्रा सुरु होत आहे, सहजयोगात एक नवी यात्रा आज सुरु होत आहे. ती ही यात्रा आहे, की आता आम्ही एका महान आंदोलनामध्ये आलो आहोत जिथे आम्हाला स्वतःचे प्रश्न राहिले नाही. सा-यांचे प्रश्न आमचे प्रश्न झाले आहेत. सान्या जगाचे प्रश्न आमचे झाले आहेत. यासाठी एक प्रबलत्व पाहीजे, एक मोठेपण पाहीजे. एक उत्तुंगता पाहीजे ज्यामुळे आपण सारे प्रश्न व्यवस्थित पाहू शकू आणि त्याचे उत्तर देऊ शकू. याची जिम्मेदारी सर्वथा तुम्हा लोकांवार आहे. सर्व सहजयोग्यांची जिम्मेदारी खूप जास्त आहे. आपण लोकांनी सहजयोगाचा फायदा घ्यावा, लाभ घ्यावा, त्यात रूजावे असे नाही. हे सर्वांच्या घरी घरी पाहीजे. आणि हे सर्वांना आनंद देते. जर हे कार्य करताना, आपण लोकांनी कुठल्या प्रकारची कमजोरी दाखविली किंवा कोणत्याही प्रकारची ढिलाई केली तर आपण त्यासाठी जिम्मेदार राहाल. आणि ही फार चुकीची गोष्ट होईल. त्यामुळे सहजयोगामध्ये स्थित झालेल्या लोकांनी वृक्षाप्रमाणे उभे राहीलं पाहीजे.

कलकत्त्यामध्ये सान्या हिंदुस्थानचे मर्म अडकले आहे. त्यामुळे आपण लोकांनी उभे राहणे, पुढे होऊन आपली प्रगति करणे आवश्यक आहे. इतरांची प्रगति करा आणि आपले व्यक्तिमत्व विशाल बनवा. जेव्हां आपल्या आंतमधे असे विचार येतील की, माझा मुलगा असा आहे, माझे घर असे आहे, तेव्हां अशा "माझ्या" विचारांना दूर ठेवा. तेव्हां आपण विशाल व्हाल. आणि अशा विशाल लोकांची या नव्या आंदोलनाला गरज आहे. आणि याची तयारी पूर्ण झाली पाहिजे. हे वर्ष आपणां सर्वांना भरभराटीचे जाईल अशी आशा आहे. फार विशेष वर्ष आहे. आणि या वर्षी कलकत्यांत खूप लोक सहजयोगांत येतील असे मला वाटते. प्रेमाने, आदराने, समजावून, कधी कधी आक्रमक असतात. कधीकधी चुकीच्या गोष्टीसुध्दां सांगतात. इथे सगळे कोणत्या ना कोणत्या जाळ्यांत अडकले आहेत.

रशियांत तर ना त्यांना भिती ना, ना त्यांचा कोणी गुरु एकदम कोरे कागद, साफ प्लेट असते तसे लोक होते. खूप सहजपणे सगळ्यांना पार केले. इथे तर असे आहे की ना इकडचे ना तिकडचे. मी या गुरुचा, नाहीतर त्या गुरुचा आहे. आपण स्वतःचे नाही. त्यामुळे खूप जाणून संवरुन गोष्टी केल्या पाहिजेत. आणि इथे आणखी रोग आहे हा की, गुरुचे दर्शन करायला जाणे. गुरुचे काम आहे बोध देणे. दर्शन देणे नाही. लोकांमध्ये जागृति करणे. जोपर्यंत ते कांही ज्ञान देत नाहीत तर ते गुरु कसे होतात? गुरुचा अर्थ आहे ज्ञान देणारे. ज्ञान म्हणजे आपल्या नसांवर हे चैतन्य काय आहे हे आपण जाणणे. जोपर्यंत हे दिले नाही तोपर्यंत अशा गोष्टींमध्ये फसणेसुध्दां एक प्रकारे स्वतःला नष्ट करणे आहे. आपण लोक खूप मोठे साधक होतां आणि आपण प्राप्त केले. आणि अशाप्रकारे आपण अनेक लोकांना याचे वरदान द्या, आणि त्यांना सुखी करा.

आपल्यामध्ये ज्या कांही कमतरता आहेत, त्या आपल्या स्वतःच्या आहेत. त्या एका भागामध्येही आहेत आणि पूर्ण भागांतही आहेत. सामुहिकतेतसुध्दां आहेत. या सर्व कमतरता पाहिल्या पाहिजेत. हिंदू, मुसलमान, खिश्चन आणि अन्य धर्मांचे लोक हेच प्रतिपादन करतील, की किती शोध घेतला, पण या धर्मांत कांही फायदा झाला नाही. याचे कारण हे सर्व मनुष्यांनी बनविलेले धर्म आहेत. ज्यांनी धर्म बनविले, ते राहिले नाही. आतां आपण लोकांनी जो धर्म बनवायचा आहे, तो खरा धर्म आहे. त्यांत नकलीपणा बिल्कुल असतां कामां नये. जर मुनष्याने धर्म तयार केला असेल तर तो चूकीचा असणारच कारण मनुष्याचा अजून परमात्म्याशी संबंध आला नव्हता. त्यांनी तर चांगल्या भल्या धर्मांना चुकीच्या रस्त्यावर आणून सोडले. पण आतां आपणाला जो धर्म बनवायचा आहे तो विश्वधर्म बनवायचा आहे. त्यांत माणसाच्या ज्या चुका {कोणत्याही प्रकारच्या} आहेत, त्या येतां नयेत. कारण हा दैवी आहे. आणि आपण लोकांनी आत्मसाक्षात्कार प्राप्त केला आहे. तेव्हां इनामदारीने याला असे केले पाहिजे की जो शुध्द आहे, अंतर्यामीच आहे.

याप्रकारे प्रत्येक माणूस जेव्हां बघेल की आम्ही यामध्ये जे मिळवले आहे ते सत्य मिळवले आहे. आणि मग असं होइल की ज्या धर्मांत आम्ही आधी होतो त्या धर्मांचे सत्य आम्ही इथे मिळवले. आणि ते आमच्या आंत जागृत झाले आहे. मानवाने केलेल्या कोणत्याही धर्मांचे आपण पालन करा. आपण कोणाचा खून करूं शकता, चोरी करूं शकता, कोणाचा सत्यानाश करूं शकता, कोणतेही पापकर्म करूं शकतां. पण सहजयोगांत आल्यावर आपण खरोखर धार्मिक बनता. आपण सर्वांचे भलेच करूं शकतां.

पण जे लोक नीवन येतात, त्यांच्याशी चर्चा करतांना खूप सांभाळून गोष्टी करा कारण त्यांच्यावर आक्रमण होते आहे, अशी कदाचित त्यांना जाणीव होऊं शकते. तेव्हां खूप संभाळून त्यांना समजाविले पाहिजे की धर्म आपल्या आंत जागृत झाला पाहिजे. असे येशू खिस्ताने सांगितले आहे की आपले डोळे "निरंजन" झाले पाहिजेत. पण कुठल्या खिश्चन माणसाचे डोळे निरंजन आहेत का? या प्रकारे या महान लोकांनी खूप मोठयामोठया गोष्टी केल्या पण ते झालेच नाही. त्यायोगे विरुध्द गोष्ट होते. तर यांना हळूहळू समजावले पाहिजे कारण हे अंधरांतून प्रकाशाकडे येत आहेत. त्यांना अनुभव देतांना या चुकीच्या समजामधून काढून घेतले पाहिजे. त्यांना धर्मामध्ये स्थित केले पाहिजे. धर्माची धारणा त्यांच्या आंत झाली पाहिजे. जो ज्याठिकाणांहून येईल त्या सर्वांचा स्विकार केला पाहिजे, कारण यांच्यामध्ये अनेक लोक असे आहेत जे खरोखर सत्याच्या शोधांत आहेत. सत्याच्या मार्गावर चालणाऱ्यांनाच परमात्मा मिळूं शकतो.

ज्योतीचं कार्य काय आहे? ज्योत जोपर्यंत जळत राहाते तेव्हां सर्व काम होते. तीचं कार्य असतं प्रकाश देणे. जो प्रकाश तुम्ही प्राप्त केला आहे तोच तुम्हाला सर्वांना द्यावयाचा आहे. आणि पूर्ण आत्मविश्वासासह. कांही घाबरण्याची गोष्ट नाही. छोटी मुलं खूप आत्मविश्वासी व्यक्ति असतात. आणि ती कशाचीही पर्वा करीत नाहीत. त्यांना जे योग्य वाटतं ते सांगतात. पण जेव्हां आम्ही लोक मोठे होतो, तेव्हां बुध्दींत खूप गोष्टी भरलेल्या असतात, खूपसे संस्कार झालेले असतात. ज्यांच्यामधून निघणे कठीण असते. तर फक्त ही गोष्ट समजून घेतली पाहिजे की आपल्याला एका अतीव समजदारीने, जाणीवने, एका प्रगल्भतेने, मॅच्युरिटीने, मोठेपणाने सर्वांशी व्यवहार केला पाहिजे. सर्वांबद्दल प्रेम दाखविले पाहिजे. कारण ही प्रेमशक्ति आहे. आणि तिलाच प्राप्त केले पाहिजे.

ही सर्वांत पहिली पुजा आहे आदिशक्तिची. आदिशक्तिमधूनच सर्व शक्त्या निघाल्या आहेत. महाकाली, महालक्ष्मी, महासरस्वती. आणि याचा तिन्ही शक्त्या परत त्यांच्यामध्येंच सामावून जातात. आदिशक्तिशिवाय कांही होऊं शकत नाही. कारण सर्व चक्रांवर त्यांचे प्रभुत्व आहे. आणि त्याच आहेत ज्या हरप्रकारे चक्रांच्या आपापसांतील संबंधांना संभाळतात. ज्याला आपण परम्युटेशन्स आणि कॉम्बिनेशन्स म्हणतो. त्यांना प्रत्येक सूक्ष्म, सूक्ष्म गोष्ट माहीत असते. जसे, कोणत्याही अवतरणाला पहा, ते पूर्ण आहे. आणि आपले जे उत्थान झाले आहे, त्याच्या प्रत्येक पायरीवर प्रगतिनिदर्शक {माईलस्टोन} म्हणून उभे आहे. पण प्रत्येकाचं कार्य एकाच प्रकारचं होतं. जसे देवीचे कार्य होते, दुष्टांचा संहार करणे आणि भक्तांचे रक्षण करणे, यासांठी सुध्दां कृष्णाने लीला रचली होती. ही सगळी लीला

आहे. यामध्ये गांभीर्याची कांही गोष्ट नाही. श्रीकृष्णांनी माधुर्याने सर्वांना जिंकले आणि असे कार्य केले की, ज्या आपल्या भ्रांती होत्या त्यांना फिरवून, थोडा गोडवा घालून, आपली गोष्ट सांगीत असत. त्यांचं एक फार सुंदर अवतरण होतं. आणि गांभिर्याने त्यांनी आत्मदर्शनाचीच गोष्ट केली. आणि ब्रह्मज्ञान. गोष्ट केली. मग खूप गंभीर गोष्टी झाल्या. आणि सर्वसाधारण लोक त्यांच्याकडे आले नाहीत. जे आले ते बेकार गांभिर्यामध्ये चालले गेले. आणि आपल्या नित्य जीवनाला खूप कठीण बनवून ठेवलं. कारण ना बुध्दाने सांगीतलं, ना महावीराने.

आतां जोपर्यंत मानव जातीमध्ये आत्मसाक्षात्कार होत नाही, तोपर्यंत त्याचे जास्त वेळ सरळ चालणे कठीण आहे. येशूख्रिस्तानंतर जे सर्वसाधारण लोक आले, त्यांनी परत पॉलच्या सांगण्यावरुन जी धर्माची रचना केली त्यामुळें सगळी गडबड झाली. याप्रकारे प्रत्येक धर्मामध्ये गडबड होत राहिली. आणि यामुळें धर्म खूप कठीण आणि अगम्य झाला. आणि आधुनिक कालांत ब-याचशा लोकांनीसुध्दां कुंडलिनीबद्दल चुकीचे सांगितले.

आतां प्रश्न असा होता की, मानवाला कशाप्रकारे सांगावे की, परमात्मा आहे. सत्य आहे. तो आत्मास्वरुप आहे. यांसाठी आदिशक्तिच्या अवतरणाची गरज आहे. आदिशक्तिच हे कार्य करुं शकते. ती सर्व चक्रांचे काम जाणते. आणि तिला मानवजातीमध्ये येऊन, मानवाप्रमाणे अवतरण घ्यावे लागले. त्यामुळे त्यांच्यामध्ये काय काय दोष आहेत ते त्यांना समजेल. आणि ते दोष काढण्यासाठी काय केले पाहिजे, हे दोष हजर असतांनासुध्दां कुंडलिनीचे जागरण कसे होईल, ब्रह्मनाडीमधून कुंडलिनीचे जागरण कसे करावयाचे, ज्यायोगे ते मानवाला प्राप्त होइल.

प्रथम यांना थोडया प्रकाशांत पाहूं दे. पाहातां पाहातां स्वतःच समजतील की स्वतःकडेच दृष्टी टाकून, पाहून, त्यांच्यामध्ये ती शक्ति येइल की स्वतःला ठीक करतील.

हे कार्य असे होते, की ज्यासांठी सर्व देवदेवता, सर्व अवतरणे, सर्व महापुरुष आणि इतरांचे येणे जरुरी होते. त्याच शरीरामध्ये धारणा करुन या जगांत अवतरण यायचें होते. आणि यांसाठी हे अवतरण झाले आहे. कारण सा-या विश्वाचे उत्थान व्हावयाचे आहे. ज्या परमात्म्याने ही सृष्टी बनविली आहे. ज्याने या विश्वाची रचना केली आहे, त्यांना हे विश्व मानवाच्या हाताने रसातळाला जावे अशी ईच्छा कधीच होणार नाही. आणि यासांठी हे कार्य अत्यंत विशाल आहे. आपल्याला सूळी दिले जाणार, असे होणे शक्य नाही. आपण मननवर चर्चा करत राहाणार, हे शक्य नाही. यावर मानवाला वाढले पाहिजे, तयार झाले पाहिजे. खूप मेहनतीचे काम आहे. पण हे फक्त आईच करुं शकते. आईचीच शक्ति हे करुं शकते. आणि त्यामध्ये प्रेम, समजूतदारपणा, सहनशीलता नसली तर ती करुं शकलीच नसती. त्यामुळें या अवतरणाचं फार महत्व आहे. आणि अशी कांही संधि आली की, पौर्णिमेचा दिवस आहे आणि आज आदिशक्तिचीच आपण पुजा करणे जास्त चांगले आहे आणि हे मिळाल्यावर सर्व कांही होऊनच जाते. कारण आपल्याला माहीत आहे की आदिशक्तिची जी महामायास्वरुपाची प्रकृति आहे, त्याचं एक मोठं कारण, की जर ती महामाया नसेल, तर आपण तिला कधी जाणूंच शकणार नाही. वस्तुतिकतेंत जोपर्यंत महामायास्वरुप आहे, तोपर्यंतच आपण माझ्या जवळ येऊं शकतां. नाहीतर येऊं शकत नाही. आपण विचार करतां, या तर शक्ति आहेत. यांच्याजवळ कसे जाणार? यांच्या पायां कसे पडणार? त्यांच्याशी कसें बोलणार? तर हे महामायास्वरुप घेतल्यामुळे ही गोष्ट खूप सौम्य झाली आहे. आणि या सौम्यतेमुळें आपण सर्व एकच आहोत. आणि हेसुध्दां खूप जरुरी होतं की, या महामायास्वरुपामध्ये आम्ही रहाणं, आणि आपण लोकांनी त्याला प्राप्त करीत रहाणे, हरवून न जातां. जसे सागरामध्ये हरवून गेले. जसे कबीरांनी सांगीतले, "जब मस्त हुए फिर क्या बोले।

आपणा सर्वांना जागृत राहावयाचे आहे. आणि सर्वांना घायचे आहे. मी तुम्हांला हरवूं देणारच नाही. या आनंदात पूर्णपणे बोध झाल्यावर कोणी हरवूं शकत नाही. हा आनंद वाटल्याशिवाय तुम्हांला चैन पडूं देणार नाही. या त-हेची गोष्ट असेल तेव्हां तुम्हा लोकांना समजेल की आपल्याला काय कार्य करायचे आहे. तर तुमचे कार्य साधुसंतांपेक्षा एकप्रकारे अधिक आहे, की साधूसंतांनी कोणाला जागृति दिली नाही. हो, उपदेश दिला, त्यांना समजाविले.

आपले कार्य हे आहे की आपण सर्वांना जागृति देणे, आणि त्यांना आत्मसाक्षात्कारी बनविणे, सर्व विश्वाचे उत्थान प्राप्त करणे. फार महत्वपूर्ण आणि दिव्य कार्य आहे. आणि या कार्यासाठी आदिशक्तिचे आगमन जरुरी होते. आणि त्या आदिशक्तिच्या आगमनानेच हे कार्य सुरु झाले आहे आणि खूप चांगल्या त-हेने होत आहे. आपणांला हे कळेल अशी आशा आहे. असे बरेचसे फोटो येत आहेत जे चमत्कारी आहेत. पण हे फोटो दुस-या लोकांना दाखवितां नयें. कारण त्यांचा विश्वासच बसणार नाही. आणि हे फोटो सुध्दां परमचैतन्य बनवित आहे तेसुध्दां एका साधारण कॅमे-यामध्ये, ज्यांत कांही शक्ति नाही. आणि जर इतका प्रकाश माझ्या डोक्यांत आहे तर तो कोणाला दिसत कसा नाही? फक्त माझ्या कॅमे-यामध्ये कसा आला? आपण लोकांसाठी तर मी महामायाच आहे. कॅमे-यासाठी कदाचित नसेल. कॅमे-याच्या आंतले जे अणुरेणू आहेत ते मला जाणतात. आणि परमात्म्याने तुम्हांला स्वातंत्र्य दिले आहे. या जड वस्तूंना स्वतंत्रता नाही ते तर परमात्म्याच्या आज्ञेनेच चालतात. आणि पशुसुध्दां त्यांच्या आज्ञेत रहातात. त्यांच्या स्वतंत्रेत कोणत्याही प्रकारची बाधा येऊं नये यासाठी महामायास्वरूप आहे, तुमच्यासारखेच आम्ही आहोत. आमचा सारा व्यवहार आपणांप्रमाणेच आहे. आदिशक्तिची आजची पुजा तुम्हां लोकांसाठी संपन्न होईल अशी आशा आहे.

माझे अनंत आशिर्वाद.

कलकत्ता
9/4/90
10/4/90

## जाहीर सभेतील भाषण

सत्याच्या बाबतीत जाणून घेतले पाहिजे की, सत्य आदि आहे आणि आपण मानव त्याला बदलूं शकत नाही. सत्याला या मानवी चेतनेमध्ये आपण जाणूं शकत नाही. त्यासाठी एक सुक्ष्म चेतना पाहिजे, त्याला आत्मिक चेतना म्हणतात. एखाद्या वैज्ञानिकाप्रमाणे आपण आपली बुध्दी उघडी ठेवा आणि सत्य सिध्द झालं, तर इमानदारीने त्याला मानून घ्या.

एक महान सत्य हें आहे की सृष्टीची चालना एक सूक्ष्म शक्ति करते आहे. त्याला परमचैतन्य म्हणतात. ती विश्वव्यापी आहे व प्रत्येक अणुरेणूंमध्ये कार्यान्वित आहे. आपल्या शरीरांतील स्वयंचलित संस्थेला (ऑटोनॉमस नर्व्हस सिस्टिमला) चालवते. जे कांही जिवंत कार्य होते ते तिच्यायोगे घडते. पण अजून आपल्यांत ती स्थिती आलेली नाही ज्यामुळे आपण परमचैतन्याला जाणूं शकूं.

दुसरे सत्य हें आहे की आपण, हे शरीर, बुध्दी, अहंकार, भावना वगैरे उपाधी नसून, फक्त आत्मा आहोत. आणि हे सिध्द होऊं शकते.

तिसरे सत्य हें आहे, की आपल्या आंत एक शक्ति आहे, जी त्रिकोणाकार अस्थिमध्यें स्थित आहे. आणि जेव्हां ही शक्ति जागृत होते तेव्हां आपला संबंध त्या परमचैतन्याशी प्रस्थापित करते. आणि याप्रकारेच आपले आत्मदर्शन होते. मग आपल्या आंत एक नवी डायमेन्शन - नवे क्षितीज- तयार होते ज्यामुळे आपल्या नसांवर समजूं शकते. जे नसांवर कळते तेच ज्ञान आहे. हे समजण्यासाठी कुंडलिनीचे जागरण पाहिजे. ती स्वतः आपली आई आहे. ही आपलीच आई आहे. आणि ही आई आपल्याला पुर्नजन्म देते. टेपरेकॉर्डरमध्ये जसे आपण सर्व कांही टेप करूं शकतां त्याप्रमाणे या कुंडलिनीने आपल्याविषयी सर्व कांही जाणलेलं आहे. साडेतीन कुण्डलांमध्ये ही वसली आहे त्यामुळे हिला आपण कुण्डलिनी म्हणतो. ही शुध्द इच्छेची शक्ति आहे. कुठलीही इच्छा पुर्णतया पूर्ण झाल्यावर माणूस त्याने संतुष्ट होत नाही कारण सर्वसाधारण इच्छा तृप्त होत नाहीत. जेव्हां ही शक्ति वर उठते तेव्हां सहा चक्रांमधून निघून सहाव्या चक्रांतून ब्रम्हरंध्राला छेदून बाहेर निघून येते. तेव्हां ही सूक्ष्म गोष्ट

आपल्या चारी बाजूला पसरलेल्या सूक्ष्मशक्तिशी - परमचैतन्याशी एकाकार होते. जसा माईक आहे, याला आम्ही मेन्सला जोडला नाही तर हा एकदम बेकार आहे. याप्रमाणे मानवसुध्दां त्या परमचैतन्याला प्राप्त केल्याशिवाय सत्य जाणूं शकत नाही. सगळे आपल्या आपल्या गोष्टीला सत्य मानतात. सत्यामध्ये कांही मतभेद असूं शकत नाही. ते मतभेद सत्याचे वेगळे पैलू आहेत जेव्हां वेगळ्या त-हेने पाहिले जातात. जोपर्यंत आपल्या चित्तांमध्ये आत्मा येत नाही तोपर्यंत आपल्यामध्ये आत्मप्रकाश येत नाही आणि आपण अंधारांतच चाचपडत रहाता.

मानवाने समाजाच्या धारणा केल्या आहेत. त्यामुळे आपल्या समाजांत कमतरता आहेत, संदेह आहेत, भ्रांती आहे. ज्या स्थितीमुळें आपण मोठमोठे ऋषि मुनी, अवतरण, पती, तीर्थंकर वगैरेंना समजूं शकूं आणि त्यांच्यासारखे बनूं शकूं अशी स्थिती आपल्याला प्राप्त केली पाहिजे. याचा अर्थ असा की धर्माची धारणा आपल्या आंत असते. पण जो कोणी एकाच धर्माचे पालन करतो तो सुध्दां पापकर्म करुं शकतो. खून करुं शकतो. कारण धर्माची भावना हा फक्त आपल्या बुध्दीचा जमाखर्च असतो. त्याचा आपल्यामध्ये प्रवेश झाला नाही. आपल्या आंतमध्ये धर्माची धारणा करूनच आपले हित होइल.

परंतु हे करतांना एका सहजप्रकारे कुण्डलिनी उत्थान पावते कारण ही जिवंत प्रक्रिया आहे. जसे पृथ्वीवर आपण बी सोडलं तर ते सहजच रूजतं. प्रत्येकांत अशाच प्रकारे कुण्डलिनी बसलेली असते, की केव्हां माझं मूल इच्छा करेल त्यावेळी मी उठेन. ती जबरदस्तीने आपल्याला पुनर्जन्म देऊ इच्छित नाही. आपलं स्वातंत्र्य पाहूनच ती जागृत होते. आणि या बाबतीत कोणीच जबरदस्ती करुं शकत नाही. सर्वंत आधी कुण्डलिनीच्या जागरणाने आपली शारिरिक स्थिती ठीक होते. कारण आपल्या शरीरांतील सारे चक्र पूर्ण पल्लवित होऊन जातात. या चक्रांच्या शक्तिमुळेच आपण जिवंत आहोत आणि त्यांच्यामुळेच आपला सर्व व्यवहार चालतो. परन्तु जेव्हां आपण शक्तिचा विनाकारण फार जास्त वापर करतो. तेव्हां ही चक्रे क्षीण होतात. यामुळे आपल्यामध्ये रोग येतात. पण कुंडलिनी जागरणामुळे तर ज्या रोगांचा इलाज नाही असे अशा असाध्य रोगांमुळे मरायला टेकलेले लोक सुध्दां एका रात्रींत ठीक झालेत.

यामुळें आपल्याला ऋषि मुनींचे आभार मानले पाहिजेत. ज्यांनी सहजयोग शोधून काढला. पहिल्यांदा एक दोन माणसंच सहजयोग जाणत होती. पण आज अशी वेळ आली आहे की आपल्याला सामुहिक पध्दतीने जागृती मिळूं शकते. या त-हेची जागृति झाल्यामुळें शारिरिक, मानसिक, बौध्दिक आणि संसारिक त्रास दूर होतात. आणि लक्ष्मीचाही आपल्यावर आशिर्वाद येतो. लक्ष्मी, ॥, सरस्वतीदेवीचे साक्षात मिळाले नव्हते त्यामुळें आम्हांला वाटले की हे सर्व होतच नाही. याला सिध्द करण्याची वेळ आली आहे. ऑस्ट्रेलियामध्ये दोन ड्रग्स झालेल्या व्यक्ति सहजयोगामुळें बऱ्या झाल्या. आपल्या देशामध्ये इतक्या व्यथा आहेत, इतकी गरिबी आहे, लोकांजवळ पैसा नाही. आपले रोग ठीक करा,डॉक्टरची बिले भरा, यांसाठी पैसा नाही, अशा लोकांसाठी सहजयोग फार उपयुक्त आहे. सहजयोगामुळे आपली शेती, पशुपालन यांवर खूप प्रभाव पडतो. अनेक क्षेत्रांमध्ये याचं कार्य होऊ शकतं. सहजयोगामुळें आपल्या आत शांती प्रस्थापित होते. ज्यांच्या अंतमध्ये शांती नाही ते बाहेर कशा प्रकारे शांती प्रस्थापित करणार?

आपल्या अंतमध्ये साक्षीस्वरूप तत्व येते. आपल्या आंत निर्विचार-समाधी स्थापित होते. आणि त्यानंतर निर्विकल्प समाधी म्हणजे चेतना आपल्यामध्ये येते. आपल्या नसांनसांवर सामुहिक चेतना जागृत होते. ज्याच्या अनुसंधानामुळें तुम्ही जाणूं शकता की. दुसऱ्या माणसाची तक्रार काय आहे? आणि आपल्याला काय तक्रार आहे? कायय कमी आहे? त्याला नीट करण्याची क्रिया जर आपण शिकलांत, तर आपण दुसऱ्यांना सुध्दां मदत करूं शकतां. आणि स्वतःलासुध्दा मदत करूं शकतां. यासाठी आपल्याला पैसे वगैरे कांही द्यावे लागत नाहीत. जी व्यक्ति परमात्म्याच्या नांवावर आपल्याकडून पैसे घेते तो आपला गुरु नाही नोकर आहे. मी एक आई आहे आणि मी हे सांगेन की ज्या गुरुने आपली तब्येतच ठीक ठेवली नाही अशा गुरुला ठेवून काय फायदा? गुरु दर्शनासाठी नसतो. गुरु ज्ञानांसाठी असतो आणि अनुभवासाठी असतो. अशा त-हेने वाचून आपण परमात्म्याला जाणूं शकत नाही. कारण परमात्मा बुध्दीच्या पलीकडे आहे. प्रश्न विचारून किंवा त्याचे उत्तर देऊन, कुंडलिनीचे जागरण होइल कां?

अमीबाहून आपण मनुष्य स्वरूपांत आलो. याहून उच्च एकच दशा आहे की आपल्याला आत्मस्वरूप प्र पाहिजे. आणि जोपर्यंत आपण आत्मस्वरूप होत नाही, आपल्याला चैन पडणार नाही. आपलीच संपत्ती आपल्यात देण्यासाठी आलो आहोत. त्यांत आपल्याला कां त्रास झाला पाहिजे? आपल्या आंत एक मोठा हिरा चमकतो आहे ज्याला आत्मा म्हणतात. याला प्राप्त करा. मानव सर्वांत मोठी गोष्ट आहे उत्क्रांतीच्ये. त्याला बस, एवढंच प्रा करायचं आहे. रशियाचे लोक खूप गहनतेते आहेत. त्यांनी कधी आपला धर्म ऐकला नाही. देवीचं नांव ऐक ऐकलं नाही. पण हे लोक एकदम पार झाले. इतक्या शुध्द प्रकृतीचे लोक जे आंतून शोधत आहेत सत्य. त्यांच सरकारनेसुध्दां आम्हांला मान्य केले आहे. सैबेरियापर्यंत सहजयोग पसरला आहे. वैद्यकीय बाबतीत, शिक्षणांत, प्रत्ये गोष्टीत, त्यांच्या मंत्र्यापर्यंत, त्या लोकांत अहंकार नाही. त्यामुळे कदाचित या त-हेने कार्य झालं आहे. इथेसुद्ध अशाप्रकारे कार्य होईल अशी आशा आहे. हे तर देवीचे फार मोठे स्थान आहे. आणि कलकत्याकडून मला ख जास्त अपेक्षा आहे.

कलकत्ता

## दुस-या दिवशीचे भाषण

11·4·19

जोपर्यंत आपण सत्य जाणीत नाही तोपर्यंत कोणत्याही गोष्टीला प्रमाण मानणे किंवा सत्य मानणे खूप मो चूक करणे आहे. खूप लोक विचार करतात की हा धर्म सत्य आहे, तो धर्म सत्य आहे. पण सत्य एकच आ

कुण्डलिनीने कोणालाही त्रास होत नाही. उत्क्रांती मध्ये आपण जे कांही मिळवलं आहे ते सेंट्रल न सिस्टिम वर जाणं शकतो. एखादे जनावर, समजा एक कुत्रा जर घाणेरड्या गल्लीतून जात असेल तर त्या कांही त्रास होत नाही. पण मनुष्य हे करुं शकत नाही. कारण त्याच्या आंत एक चेतना आली आहे, ज्या तो घाण बघूं शकतो, समजूं शकतो, तिची घृणा करतो. याप्रकारे आपली ही चेतना प्रगल्भ होते आणि आपल्यामध्ये धर्माची धारणा होते मग तर तो कोणतेही चुकीचे कार्य करीत नाही. जसे साधूसंत कधी चुकीचे काम कर नाहीत.

जेव्हां कुंडलिनीचे जागरण होते त्यावेळी आपल्यामध्ये पूर्णरितीने राजयोग प्रतीत होतो. ज्याप्रमाणे आप गाडी चालू केली की त्याची मशीनरी आपोआप चालूं होते. त्याप्रमाणे जेव्हां कुण्डलिनी जागृत होते तेव्हां कुठल्या चक्रांतून जाते. त्यावेळी त्या चक्राचा बंध पडतो ज्यामुळें कुंडलिनी खाली येणार नाही. जेव्हां विशुध्दी चक्रावर तेव्हां आपली जीभसुध्दां थोडी आंतल्या बाजूला खेचली जाते बंध पडल्यामुळें. गाडी सुरु करण्याआधी आपण च फिरवूं लागावे, असा याचा अर्थ नव्हे. आजकालचे मानवाने बनवलेले योग हे अशा प्रकारचे कृत्रिम आहेत. कुंडलिनी जागरण झाल्यावर, त्यावेळी त्या चक्रावर शारिरिक दोष असतील तेव्हां हटयोग केला पाहिजे. हटयोग आपण अ प्रकारे करतो जसे सर्व औषधे एकाच वेळी खाणे। प्राणायामसुध्दां आपण कृत्रिम त-हेने करतो. ज्यावेळी आप कुण्डलिनी चढते आणि आपल्या आंतील उजव्या बाजूची शक्ति कमी पडते त्यावेळी आपण लोक प्राणायाम करुं शकतं पण समजून संवरुन। जर आपण उगीचच प्राणायाम केला तर आपल्याला व्याधा होऊ शकतात किंवा आपण एक शुष्क होऊं शकता. इतके शुष्क होता की आपल्यामध्ये कोणतीच भावना रहात नाही. आणि असं होऊं शकतं आपण आपल्या पत्नीला, मुलांना सोडून देता, आणि मी कोणी मोठा साधूसंन्यासी झालो असा विचार करुं लागत या त-हेचं असंतुलन जीवनामध्ये येतं. कुंडलिनी जागणानंतरच समजतं की कुंडलिनी उठून कोणत्या चक्रावर गे आहे, कोठे थांबली आहे, कोणत्यावेळी कुठल्या गोष्टीची गरज आहे.

आपल्यामध्यें तीन नाडया आहेत. पहिली महाकालीची आहे. ती डाव्या आणि सिंम्पथेटीक नर्व्हस सिस्टिम चालते. आणि उजवीकडची आहे महासरस्वतीची. ती उजवीकडच्या सिम्पथेटीक नर्व्हस सिस्टिमला चालते. मध

नाडी, जी सुषुम्ना नाडी आहे ती आमच्या पॅरासिम्पथेटीक नर्व्हस सिस्टिमला पहाते. डाव्या बाजुला जी आहे ती फक्त आपल्या भावना इच्छा पु-या करते. ती इच्छाशक्तिची इडा नाडी आहे. किंवा चंद्र नाडी. जो आपला भूतकाळ आहे, तो डाव्या बाजूला या बरोबर सामावला आहे.

उजव्या बाजूच्या नाडीला सूर्य नाडी, किंवा पिंगला नाडी म्हणतात. ती आपले शारीरिक आणि बुध्दीचे काम - विचार करणे वगैरे कार्य करते. जेव्हा आपण भविष्याचा विचार करतो त्यावेळी ती कार्यान्वित होते. मधली नाडी /या दोघांना संतुलनात ठेवते. त्याप्रमाणे आपण खूप जोरात धावला, तर हृदयाचे ठोके वाढतात. पण या ठोक्यांना परत शांत केलं तर त्यायोगे ते परत नॉर्मल होतात ते पॅरासिंपथेटिक किंवा सुषुम्ना नाडीचे काम आहे. जेव्हा कुंडलिनी जागृत होते तेव्हा सुषुम्ना नाडीच्या अंतरंगात जी नाडी आहे, तिला ब्रम्हनाडी म्हणतात त्यामध्ये जाते, आणि एका केसाप्रमाणे ही शक्ति वर जाऊन ब्रम्हरंध्राला छेदते. हे छेदन होताच वरुन परमचैतन्य वाहू लागते, आणि त्यायोगे आपली संबंधित चक्रे उघडली जातात. या प्रकारे आपला संबंध त्या परमचैतन्याशी होतो, त्याची सूक्ष्म सृष्टी आहे जिला आपण अजून जाणलं नाही। हे जाणणं, आपल्या बोटांवर कळतं. हातामध्ये चैतन्याच्या लहरी वाहणे सुरु होते. श्री शंकराचार्यांनी याला सलीलम् म्हटलं आहे. थंड थंड हवा हातात येऊ लागते. ही हवा आपल्याला दाखवते, जाणवून देते की आपल्यामध्ये कोणते दोष आहेत, दुस-यांमध्ये कोणते दोष आहेत. जेव्हा आपले ब्रम्हरंध्र छेदले जाते त्यावेळी आपल्या डोक्यातून सुध्दा थंड हवा येऊ लागते. पण जोपर्यंत आपण याचा उपयोग करीत नाही तोपर्यंत आपल्याला समजू शकत नाही की ही थंड हवा काय गोष्ट आहे व त्यामुळे काय प्राप्त होणार आहे.

ज्यावेळी मनुष्य आपल्या भूतकालाविषयी विचार करतो आणि नेहमी दुःखी रहातो, स्वतःला खूप न्यून समजतो त्यावेळी आपण या नाडीवर खाली खाली जात सामूहिक सुप्त चेतनेमध्ये जातो. (कलेक्टिव्ह सब - कॉन्शसमध्ये) यामुळे आपल्याला खू मानसिक त्रास होतो. फेफ-यासारखे रोग होतात (एपिलेप्सी) दुःखी प्रकारचे लोक असतात, जे वेडे होतात ते सर्व या नाडीच्यामुळे.

उजव्या बाजूची नाडी कमी होते जेव्हा आपण खूप जास्त विचार करतो किंवा खूप शारीरिक श्रम करतो. खूप जास्त विचार करण्यामुळे आपल्या आत खूप असंतुलन येते. जर आपण उजव्या बाजूची शक्ति खूप खेचली, किंवा डावीकडे ओढली तर हे संकीर्ण होत जातात आणि आपली शक्तिसुध्दा क्षीण होत जाते. जर कोणत्या आघातामुळे डावी किंवा उजवीकडे हिला तोडले तर आपला मेनस-शी संबंध तुटतो. आणि उजव्या बिटीस, लिव्हर कीडनी चे रोग पिंगला नाडी मध्ये बिघाड असल्यामुळे होतात. ब्लडप्रेशर, टेन्शन वगैरे होते. याचे एकच कारण आहे आजकालचे जीवन., यात आपल्या खूप संघर्षाबरोबर राहावे लागते. आणि शिवाय माणूस खूप विचार करतो. पुढच्या गोष्टीचा विचार करीत राहातो. या विचारांमुळे आपले स्वाधिष्ठान चक्रात बिघाड येतात. स्वाधीष्ठान चक्राला फार आवश्यक कार्य करायचे असते, ते म्हणजे आपल्या मस्तकात ज्या ग्रे सेल्स आहेत त्यांना परत परत पूर्ण करणे. खूप विचार करुन ग्रे सेल्स संपून जातात. आणि ग्रे सेल्स बदलण्यात या चक्राचे सर्व ध्यान जाते. तर ह्याची बाकीची कामे राहून जातात. जसे लिव्हर ना पॅन्कीआस, सप्लीन, किडनी, इन्टेस्टाइन यांची देखभाल करणे. मग यांच्यामधे रोग होतात. ते फक्त सहजयोगाद्वारेच ठीक होऊ शकतात. कुंडलिनी जागृण याचंकांना परत जोडते व परत शक्ति या चक्रांमध्ये येते. आणि कुंडलिनी स्वतःच या चक्रांचे पोषण करते.

डायबिटीस खूप विचार करणा-या मंडळींमध्ये होतो. त्यांचे पॅनक्रिआस खराब होते. रक्ताचा कॅन्सर आपल्या स्प्लीन मुळे होतो. आज कालचे जीवन फार उलटसुलट आहे. स्प्लीन दमते शॉक मुळे, मग रक्ताचा कॅन्सर होतो।

आपले आजकालचे जीवन फार असंतुलीत झाले आहे. यावेळी फक्त कुंडलिनी जागरणानेच आपण आपल्या चक्रांचे पोषण करु शकतो. इडा नाडी बद्दल सांगायचे आहे की माणूस रात्रंदिव रडत रहातो. बंगालमध्ये इतकी कला आहे, देवीचे इतके कार्य झाले आहे, मग इथे इतकी गरीबी का? याचे एक कारण आहे. इथे चेटूक आणि

/ जी सुषुम्ना

तांत्रिक फार आहेत. पूर्ण विश्वापेक्षा इथे सर्वांत जास्त आहेत. महाकालीच्या विरोधात हे लोक कार्य करतात. ज या चेटूकविद्येला आपण मूळापासून काढून फेकून द्या मग पहा इथे लक्ष्मीचा वास येईल. या चेटूकविद्येने खूप लो इथे आजारी पडले आहेत. जर आपल्याला सत्य शोधायचे आहे, आणि जर आपण आपले हित इच्छिता तर य सगळ्याला सोडून, सहजयोगामध्ये उतरा.

**जाहीर सभेतील भाषण**

रामलीला मैदान, दिल्
4/4/199

आपल्याला हे जाणलं पाहिजे की सत्य आपल्या जागेवर आहे. आपल्या बुद्धीने आपण त्याला समजू ना किंवा त्याला बनवू वा खराब करु शकत नाही. ते जसे आहे तसेच आहे. आपल्या अहंकारामुळे मानवाला वाट की परमात्म्याचे नांव घेऊन तो त्याला हवे त्याप्रमाणे त्याला घडवू अथवा बिघडवू शकतो. मानवाच्या आंत ही स्थित अजून आली नाही की तो या चारी बाजूला पसरलेल्या चैतन्याची शक्ति आणि दैवी गुण जाणेल. या शक्तिला जाण सर्वांत महान सत्य आहे. ही शक्ति जगाचे सारे काम, सारे जिवंत कार्य जगाला इर प्रकारे व्यवस्थितपणे ठेवण कार्यान्वित असते. आणि याचे संतुलन, पालन-पोषण करते. यालाच "रुह" किंवा "चैतन्य" असे म्हणतात. किं "होली घोस्ट" असंही म्हटलं जातं. ही शक्ति स्थित आहे हे पहिलं सत्य आहे. दुसरं सत्य हे आहे की आप स्वतः हे शरीर, बुध्दी, अहंकार वगैरे काही नाही, आपण फक्त आत्मा आहोत जो या शक्तिला जाणू शकतो आं पूर्णतया तिला आपल्यामध्ये समावून घेऊ शकतो.

या शक्तिला प्राप्त करुन घेणं, हाच मानवाच्या उत्क्रांतिचा अंतिम चरण आहे. आणि त्यामध्ये एकाकार मिळणे हाच एक योग आहे. आज आपण एका अमीबाचे मानव बनला. आता मानवानंतर त्याची जी दुसरी द आहे, त्यात मानवाला आता संत बनायचे आहे. म्हणजे त्याला आत्मसाक्षात्कार पाहिजे. याशिवाय आपण "केव सत्य" जाणू शकणार नाही. सर्व धर्मामध्ये एकच तत्व आहे पण ते समजण्यासाठी सर्वप्रथम आपल्याला आत्मस्वा झाले पाहिजे. कारण हा आत्मा त्याच परमात्म्याचे आपल्यामधील प्रतिबिंब आहे. ते घटीत झाल्यावर, सर्वांत आध आपली तब्येत ठीक होते. आपण कोणत्याही धर्मांत जा, काही कर्मकाण्ड करा, कोणत्याही गुरुकडे, जागृतिशिव आपली तब्येत ठीक होऊ शकत नाही. आपण कसलाही विश्वास ठेवा, पूजा पाठ करा, मंदीर, मशीद चर्च किं गुरुद्वाऱ्यांत जा आपल्यामध्ये शांती नेहमीसाठी येत नाही. आणि जोपर्यंत मनुष्याचा परमेश्वराशी संबंध होत न तोपर्यंत हे बोलावणे, ओरडणे रडणे सगळेच व्यर्थ आहे. जसे टेलीफोनचे कनेक्शन नाही आणि आपण टेलिफोन बोलत राहिला आहात, परमात्मा तर आपले ऐकतच नाही.

प्रश्न असा करतां की, परमात्मा आहे की नाही? परमात्मा बिल्कुल आहे. पण हे सत्य समजण्यास आपल्याला आत्मसाक्षात्कारी झाले पाहिजे, वली झाले पाहिजे. कारण त्याशिवाय कारण त्याशिवाय ना आपण परमात्म्याल ना या चैतन्याला समजू शकणार। आता एक पायरी माणसाला वर जायचं आहे. या पायरीला लागलं कीच आपल्या समजेल, या सृष्टीमध्ये जेवढे मनुष्य आहेत ते एका विराटाचे, आकाशाचे, अंगप्रत्यंग आहेत. आणि आपल्या एक नवे क्षितिज तयार होते, यामध्ये आपण स्वतःलासुध्दा जाणूं शकतां ही सामुहिक चेतना आहे. आपण नेह "माझे", "माझे" म्हणतो, पण हा मी कोण आहे? याला जोर्यंत आपण जाणत नाही, तोपर्यंत आपल्यामधील आत्म आपण आपले चित्त आलोकित केले नाही, त्यांत जोपर्यंत प्रकाश आला नाही, तोपर्यंत आपण जे काम करता अंधारात करीत आहात यामुळे कबीरांनी म्हटले, "कैसे समझावुं सब जग अंधा।" जाणण्याची गोष्ट आहे की,

साधु, वली जसे निजामुद्दी साहेब, नानक, रामदास मोठे मोठे संत होऊन गेले, दुस-यांना सांगत होते, की तुम्ही चांगल्या मार्गावर चाला. पण दुसरे त्या मार्गाने जाऊ शकत नव्हते कारण त्यांच्या आंत आत्म्याची शक्ति नव्हती. जेव्हा आत्म्याची शक्ति येते, तेव्हा आपल्या सा-या खराब सवयी सुटून जातात. आपोआप. आपल्यामध्ये स्थित असलेली जी आई कुंडलिनी आहे, तिला "असस" सुध्दा म्हणतात. ही जेव्हां जागृत होते, तेव्हा या कुंडलिनीमुळे आपण एकदम स्वच्छ होतों आणि आपली शारिरिक, मानसिक बौध्दिक सफाई होऊन जाते. सर्वात मोठी गोष्ट ही आहे की आपण केवल सत्य जाणतां.

अशा त-हेच्या गोष्टी ब्रह्मयशिवाय ना तर आपला देश ठीक होऊ शकत; ना सारं विश्व, विश्वामध्ये लोक शांतीच्या गोष्टी करतात. पण ज्याच्या हृदयांतच शांती नाही. तो कशाप्रकारे शांतीला प्राप्त करणार? शांतीच्या वेगवेगळ्या संस्था केल्या गेल्या आहेत आणि दोन्ही आपापसात भांडत आहेत. धर्माच्या नावावर भांडत आहेत का? कारण आम्ही अजून आपल्या आत धर्म जागृत केला नाही. सर्वांचा एकच धर्म आहे आणि तो धर्म आहे परमशक्तिला आपल्यामध्ये प्राप्त करुन घेणे, तिच्याने आपल्याला अलंकृत करणे. सजविणे. ही सजावट मनुष्याला खूप सुंदर बनविते. त्याचे चरित्र सुंदर होते. तो एक साक्षीस्वरुप होतो. तो कोणत्याही गोष्टीकडे लालच किंवा वाईट नजर टाकू शकत नाही. त्याची दृष्टी इतकी निर्मळ होते, इतकी शुध्द होते की अशी दृष्टी माणसावर पडेल, ज्या घरावर पडेल, ज्या ठिकाणी पोहोचेल ती जागा पवित्र होते आणि तिथे सर्व शुभ होते. परदेशामध्ये बरेचसे लोक मला सांगतात की माताजी, आपल्या देशामध्ये इतके धार्मिक लोक आहेत पण मग आपल्या देशात इतकी गरिबी का आहे? ती यामुळे आहे कारण की कोणाचाही परमात्म्याशी संबंध आलेला नाही. जेव्हा परमात्म्याचा संबंध येतो तेव्हा त्याच्यामध्ये शक्त्या येतात. सर्वात मोठी शक्ति येते ही की आपण दुस-यांना जागृति देऊ शकता. आपण दुस-यांना आत्मसाक्षात्कारी बनवू शकता. एकामधून हजार होऊ शकतात.

त्याचे विशेष परिवर्तन होते. रागीट आणि भांडखोर लोक सुध्दां एकदम शांत होऊन जातात. विचलित व्यक्ति किंवा कोणी दुःखी आहे, संकटात आहे त्याच्या सा-या व्यथा नष्ट होतात. आणि ते आनंदाच्या सागरांत बुडून जातात. अशी व्यक्ति न आततायी असते न कोणावर जबरदस्ती करते. ती तर सर्वांना ठीक करु शकते. या त-हेचं व्यक्तित्व सा-या संसारात तयार होऊ शकतं, कारण आता कलियुग संपून कृतयुगाची सुरुवात झाली आहे. या कृतयुगात परमचैतन्य कार्यान्वित आहे, त्याच्या कार्यामुळे हजारो लोक आता पार होऊन जातील. जे येतील त्यांना त्यांची जागृति व्हावी अशी इच्छा होईल.

प्रत्येक देशात साधुसन्त झाले आहेत. नाहीतर आधी एक किंवा दोन होते. सर्वांना त्रास दिला गेला होता. श्रीकृष्ण, महम्मदसाब, सॉक्रेटीस, लाओ त्से सर्वांना त्रास दिला गेला. आणि सर्व संताचा छळ केला कारण ते एकटे होते. पण आता ते सामुहिकतेमध्ये आले आहेत. आता कृतयुगामध्ये सा-या संतांचे रक्षण होणार आहे. आणि त्यांना कोणीही सतावू शकणार नाही. आणि जो त्यांना सतावण्याचा प्रयत्न करेल त्यावर कृतयुगाचा जरुर दण्ड येईल.

जर आपल्याला आपले हित पाहीजे, आपण आपले शुभ इच्छिता, वास्तवीक आपल्याला आपली तब्येत ठीक करुन घ्यायची आहे, आपली स्थिती आणि परिस्थिती ठीक करायची इच्छा आहे तर, आपण जे आहात, ते आपण घेत कां नाही? कशाला या अंधःकारामध्ये बेकार भांडणे करत उभे आहात? आपल्या प्रत्येकाच्यामध्ये एक शक्ति आहे. ही आपली स्वतःची आई आहे जी तुम्हाला पुनर्जन्म देण्यासाठी आली आहे. आणि आपण याला प्राप्त करावं अशी तिची इच्छा आहे. सर्व धर्मांचे सार हेच आहे, की या "परम" ला प्राप्त करा. जर या परमला प्राप्त केले नाही तर सारे जीवन व्यर्थ गेले. ज्या गोष्टीची आज सा-या विश्वाला गरज आहे, ती गोष्ट आपण प्राप्त करु या. बाकी सर्व कार्य जी होतात आणि क्षणाची असतात ती व्यर्थ आहेत. तीं नष्ट होणार. पण हे कार्य सदा राहील, ज्याबद्दल आपण पहाल, की आपली मुले, आपला समाज, सारे विश्व आपल्याला धन्यवाद देइल. हे जिवंत कार्य

आहे. यासाठी आपण पैसे देऊ शकत नाही. जसे एक बी रुजत घातले तर धर्तीमाता आपल्या शक्तिनेच त्याला उगवू देते, त्यासाठी कांही घावं लागत नाही. परमात्म्याच्या नांवाने एक पैसा जर आपल्याकडून कोणी घेताला तर समजा की ते आपले गुरु नाहीत. ते आपले नोकर आहेत जे आपल्या आधाराने चालतात. धर्माच्या नावाने पैसे कमविणे महान पाप आहे, आणि त्यांना पैसे देणे सुध्दा मूर्खपणाचे लक्षण आहे. जोपर्यंत आपण या सच्च्या दरबारात येते नाही तोपर्यंत खरे व खोटे यांची ओळख आपल्याला होत नाही.

संचय करणे तर खूप सोपे आहे. शिकून तर माणूस आपली संचयी होतो. यामुळे कबीरांनी म्हटलं "पढी पढो पंडीत मूर्ख भये।" त्यांची संवेदना कमी होते आणि ते बुध्दीच्या तर्क वितर्कांनी सत्य काय ते जाणू इच्छीतात. सत्य बुध्दीच्या पलीकडे आहे. हे जिवंत कियेबरोबर असतं. जर आपण एक शास्त्रज्ञ आणि वैज्ञानिक आहात तर आपल्याला आपली बुध्दी उघडी ठेवली पाहीजे. आपल्या इमानदारीने कारण की ही आपल्या हितासाठी आहे आणि सा-या जगाच्या हितासाठी आहे.

या प्रकारे एक दुसरा प्रश्न होतो की कलियुगामध्ये अवतार कधी होणार? आणि अवतार झाला तर आपण त्याला ओळखणार का? पहिली ही तयारी तर होऊन जाऊ दे की जो अवतार होईल त्याला आपण ओळखू. तर सगळ्यांत आधी आपल्यामध्ये आत्मसाक्षात्कार झाला पाहीजे. तर आपण अवतार ओळखू शकाल. त्यानंतर आपल्याला सत्य आणि असत्याची ओळख होईल. जसे अंधारात साप हातात पकडून त्याला आपण दोर समजून बसता. पण जसा प्रकाश येतो तेव्हा आपणहून तुम्ही त्या सापाला सोडून देता. त्याप्रकारे असत्य स्वतःहूनच सुटते.

कुंडलिनी जागरण खूपच सहज आहे. ज्याप्रमाणे एक बी आपण पृथ्वीमध्ये सोडता, तर ही माता आपणच त्याला जागृत करुन देते कारण मातेमध्ये ही सृजनशक्ति आहे आणि बी मध्ये पण शक्ति आहे तर आपण स्वतः घटित होते. हा निसर्गाचा नियम आहे. आपल्या पुस्तके वाचण्याने, किंवा थोप लावून किंवा चर्चा करुन काय ते बी उगवते? जोपर्यंत आईच्या आत घालीत नाही तोपर्यंत ते उगवू शकत नाही. त्याप्रमाणे हे सुध्दा एक जीवंत कार्य आहे. सूक्ष्म शक्ति ही आपल्यामधील कोणती आहे? ज्या शक्तिमुळे आपण अमीबाचे मानव बनतो. डॉक्टर आणि वैज्ञानिकसुध्दा अशा प्रश्नांची उत्तरे देऊ शकत नाही. ज्यांचे उत्तर आपल्याला फक्त सहजयोगात मिळते. कारण सहजयोगाने ज्या शक्तिमुळे सर्व दुनियेतील गोष्टी झाल्या, ज्या विज्ञान जाणत त्या शक्तिबरोबर एकाकारिता प्राप्त केली आहे. आपण तर जे समोर आहे. जे दिसते आहे त्याचे विज्ञान समजून घेता. ज्या गोष्टी अदृष्यात आहे त्यांच्यासाठी आपल्याला अदृष्यात उतरले पाहीजे.

पश्चिमी देशांमध्ये सर्व व्यवस्थित नाही. त्यांच्याजवळ ना आई वडील आहेत, ना मुलं, ना नातेवाईक आहेत. सर्व कांही पैसा पैसा झाल्यामुळे लोक खूप त्रस्त झाले आहेत. जी झाडाची मुळं आहेत. त्यांची आपली जबाबदारी आहे की याची शक्ति सा-या जगाला पोहोचवणे. नाहीतर आपण याचा स्विकार केला नाही. ही जिम्मेदारी आपल्यावर येईल. आता ही आपली विरासत आहे. अनादिकालापासून कुंडलिनी बाबत आपल्या देशामध्ये लिहीलेलं आहे. ताओमधे कुंडलिनी आहे. बायबलमध्ये तिला होली घोस्ट म्हणतात. याचा वृक्ष तुमच्या आत आहे. हा जो जीवनाचा वृक्ष आहे त्याच्यामुळे तुमचा पुर्नजन्म होणार. प्रत्येक ठिकाणांहून सांगीतले गेले आहे की, "ज्या नष्ट होणा-या, निरर्थक गोष्टी आहेत त्यांचा वापर समजदारिरत्या केला पाहीजे. जितकी शास्त्रे आहेत, जितके धर्म आहेत, त्यांचे मूलतत्व एकच आहे की आपण ते अनंत जीवन प्राप्त करावे. बाकी सारे व्यर्थ आहे.

जे काही आपण करत आहोत, प्रार्थना करणे, मंदीर, मशीदीत जाणे त्या सर्वाचा हेतू एकच आहे, की अनंत जीवन प्राप्त करावे. ते प्राप्त करायला आपल्याला आत्मसाक्षात्कार घेतला पाहीजे. हे सहज घडते आहे त्यामुळे लोक विचार करतात की असे कसे होऊ शकते. जर हे सहजात नसते तर आपण लोकश्वाससुध्दा घेऊ शकलो नसतो. जर श्वास घेण्यासाठी आपल्याला पुस्तके शास्त्रे वाचावी लागली असती तर किती लोक जिवंत राहीले असते? त्या प्रकारे ही सुध्दा नितांत आवश्यक गोष्ट आहे. ही क्रिया होणार होती आणि घटीत होते आहे. यावर

ते एक मोठा ग्रंथ लिहीला आहे. ज्याला नाडी ग्रंथ म्हणतात.

मुश्कील हीच आहे की आपल्या समोर स्वयंसिध्दा ठेऊनसुध्दा आपल्याला उदाहरणे द्यावी लागतात. तेव्हा लोकांच्या समजण्यात येते. जर मी तुम्हाला सांगीतले की इथे एक अनमोल हीरा पडला आहे. तो आपण घ्या वगैरे, पैसे दिले, तर काय आपण बसून रहाल. सगळ्या दुनियेतून लोक धावून येतील. तीच गोष्ट, जर मी सांगीतले की आपल्या हृदयामध्ये एक हीरा आहे ज्याचा प्रकाश आपल्या चित्तात घ्या तर आपण शंकेवर शंका काढत रहाणार का?

आणि एक गोष्ट विचारली ही कृतयुगाची गोष्ट शस्त्रांमधे लिहीली नाही. सूपश्च गोष्टी शास्त्रांत लिहील्या नाहीत, जर सगळ्या गोष्टी लिहायच्या होत्या तर आज आम्ही इथे कशाला उभे असतोय. हे सुध्दा लिहीले नव्हते की कुंडलिनीच्या जागरणानंतर आपल्या बोटांमध्ये जागृति येते. हे सुध्दा लिहीले नव्हते की यामध्ये आपण चक्रांना जाणता. लिहीलेल्या सगळ्या गोष्टी जर अखेरचा शब्द असतात त्यांचयानंतर काही सांगायचंच नसतं तर या पुढच्या गोष्टी का सांगीतल्या? भविष्याच्या गोष्टी का सांगीतल्या? कलीयुगाच्या गोष्टी का सांगीतली कारण कलियुगातही काही ना काही कार्य होणार आहे आणि इतके महत्वपूर्ण, इतके उंच, इतके दिव्य कार्य आहे की जोपर्यंत आपण या कार्यात उतरु शकत नाही, तोपर्यंत ते समजू शकत नाही, पर्वताच्या खाली उभे राहून आपण कुठल्या सुंदर शहराची शोभा बघु शकत नाही. आपल्याला पर्वतावर चढावे लागेल जर आपल्यामध्ये इतके सौंदर्य, इतका गौरव इतके सारे काही लपले आहे तर ते मिळवण्यासाठी अडकत राहाणे फार मोठी अक्लेची गोष्ट नाही. आपलीच संपती आपल्यामध्ये आहे. कुंडलिनी तर आपल्यामध्येच आहे तर तिला मिळवण्यासाठी कशाला अडखळत रहायचे. या कुंडलिनीच्या जागरणात आपल्याला कळेल की जितके सारे धर्म झाले ते सारे धर्म एक जिवंत वृक्षावर एका फूलाप्रमाणे वेगवेगळया वेळी आले आणि नंतर जे आले त्यांचे एकमेकांशी नाते होते. पण त्यांना आपल्यावर आपण ती फुले तोडली. आणि त्या फुलांना आपण आपल्या ओंजळीत घेतले आणि सांगू लागलो की ही आमची फुले आहेत, मग ही फुले मरुन गेली आणि या मेलेल्या फुलांसाठी काळजी करु लागले.

हे सर्व लोक नातेवाईक आहेत. सारे हा विचार करुन जगात आले होते की एकामागून एक आम्ही लोकांना समजावू की वेळ येणार आहे, या वेळी आपल्याला आत्मसाक्षात्कार प्राप्त होणार आहे. आणि त्यानंतर आपण परमात्म्याला जाणू शकू. येशू ख्रिस्ताने सांगितले स्वतःला जाण. सर्वांनी हेच सांगीतले विश्वामध्ये जे महान साधू, महर्षी, अवतरण, पैगंबर सर्वांनी एकच गोष्ट सांगीतली की तुम्ही स्वतःला जाणा, ओळखा. पण कसे? हीच गोष्ट आहे, की आपल्या आंत शक्ति आहे तिची जागृति झाली पाहीजे आणि जागृत होताच आपण हीला प्राप्त करु शकता.

दिल्लीमध्ये दोन डॉक्टरांना सहजयोग विषयावर एमडीची पदवी मिळाली करनालमध्ये एक तीस वर्षांचा मुलगा आला. जो बालपणापासून, बोलू शकत नव्हता किंवा ऐकू शकत नव्हता. सहजयोगामध्ये येताच त्याने बोलणे चालू केले. रक्ताचा कॅन्सर आणि इतर रोग बरे झाले. पण सहजयोग ठीक करण्यासाठी नाही. हा कुंडलिनी जागृतिसाठी आहे. जर आपण व्यवस्थित सहजयोगामध्ये बसला आणि ध्यानधारणा केली तर आपल्याला काही रोग होत नाहीत.

सर्व म्हणजे शास्त्रे, गीता, रामायण इत्यादींना समजण्यासाठी आत्मसाक्षात्कार प्राप्त करुन घेणे फार जरुरी आहे. गीतेवर पाचशे पुस्तके लिहीली आहेत. जर सत्य एकच आहे तर इतकी पुस्तके कशाला? कारण सर्वांची दृष्टी सूक्ष्म नाही.

श्रीकृष्णांनी गीतेमध्ये ज्ञानयोगाचं वर्णन केलं आहे. ज्ञानयोगाचा अर्थ वाचणे, पाठ करणे, समजणे नाही, हा ज्ञानयोग नाही, हा बुध्दीयोग आहे. ज्यामुळे माणूस घमेंडीत होतो, आणि गीतेमध्ये, असे लोक गीता ऐकवत नाहीत. स्वतःच्याच गप्पा सांगत आहेत. ज्ञान याचा अर्थ आहे आपल्या नसांवर जाणणे. या वली, बुध्द लोकांनी आपल्या बुध्दीने जाणले नव्हते, कारण हे थोडेच कॉलेजमध्ये गेले होते? हे त्यांनी आपल्या नसांवर, आपल्यामध्ये जाणलं. हाच ज्ञान मार्ग आहे. जेव्हा अर्जुन याला समजू शकल नाही तेव्हा त्याला भक्तिमार्गावर चालायला शिकवले.

पण त्यांनी सांगितले की ही भक्ति अनन्य असली पाहिजे. म्हणजे ज्यांत दूसरा कोणी नसेल. जेव्हा आपला संबंध परमेश्वराशी झाला, आपण एकाकारितेमध्ये आलात, रोज 'हरे कृष्ण, हरे राम' करुन आपल्याला परमात्मा कधी मिळू शकत नाही. उलट आपल्याला कॅन्सरचा रोग होइल. कारण श्री कृष्ण आपल्या विशुध्दी चक्रावर बसले आहेत. आणि त्यांचे नाव अशा प्रकारे बेकार घ्यायचं, ते काही आपले नोकर नाहीत जे दर वेळी त्यांचे नाव घ्यावे. जर एका साधारण गव्हर्नरचं सुध्दा आपण नाव घेत बसलो तर आपल्याला पोलीस पकडून नेतील. आणि त्या सर्वात उच्च परमात्म्याचं नाव अशा त-हेने घेतात जसे तो आपल्या खिशातच बसला आहे. इतका स्वस्त आहे। मग ते नाराज होतात आणि आपल्यावर आपत्ति येते. मग लोक सांगतात, अरेही दहा लाख जप केला, मंत्र पाठ केला हे आलं कारण जोपर्यन्त आपल्यामध्ये एकाकारिता नाही तोपर्यन्त आपल्याला अधिकार नाही. आपण पहिल्यांदा आत्मसाक्षात्कार प्राप्त करा. मगच त्यांच एक अक्षर उच्चारुनही आपलं काम होऊन जाईल. अजून पर्यन्त कोणाचा फायदा झाला आहे? उगाच परमात्म्याचे नाव घेऊन संस्था खोलून, धर्माच्या नांवावर वेगवेगळे धंदे करुन कोणत्या धर्मात मनुष्याला फायदा झाला आहे? प्रत्येक ठिकाणी संकटे गरिबी, त्रास आणि श्रीमंत लोकांकडे इतके रोग, इतका असंतोष आहे, इतकी भांडणे आहेत. मग लोकांनी म्हटले परमात्मा नाहीच. त्यांना जाणण्यासाठी फक्त आपली दृष्टी आपण प्राप्त करुन घ्या. जेव्हा आपण त्यांना जाणाल तेव्हा आपला ज्ञानमार्ग पूर्ण होऊन जाईल. आणि तेव्हा आपण भक्ती करु शकाल.

मग कर्म योगाबरही श्री कृष्णांनी सांगितले, कृष्ण तर लीलाच करीत होते. त्यांना माहीत होते की लीलेनेच आपण लोक ठीक होणार. त्यांनी सांगितले की तू जे कर्म करतो आहेस ते कर पण ते सर्व कर्म परमात्म्याच्या चरणी ठेव. पण असे होत नाही. जोपर्यन्त आपल्याला आत्मसाक्षात्कार मिळत नाही, तोपर्यन्त आपला हा अहंभाव की, हे मी करतो आहे, जाऊ शकत नाही. कोणी माणूस कोणाचा खून करेल, किंवा चूकीचे काम करेल आणि म्हणेल मी सर्व परमात्म्यावर सोडले आहे, आपला अहंभाव अजून आपल्यामध्ये आहे आणि त्या अहंभावामुळे आपण सर्व कार्य करीत आहात. आणि नेहमी ही भावना आपल्यामध्ये असत राहील. पण कुण्डलिनी जागरणानंतर जेव्हा ती आज्ञाचक्र भेदून जाते तेव्हा आज्ञाचक्राच्या एका बाजूला असलेला अहंकार दुस-या बाजूचे संस्कार हे पूर्णपणे आतल्या बाजूला खेचले जातात. तेव्हां आपले जे कर्म आहे ते सारे संपले. जनावरांमध्ये काही कर्मांचा विचार नसतो. त्यांना पाप समजत नाही. मनुष्यालाच वाटते हे पाप आहे, हे पुण्य आहे. हे त्याच्या अहंकाराचे कारण आहे त्यामुळे तो विचार करतो की हे मी केले आहे, हे पाप केले आहे. आपण सर्वांना क्षमा करा, आणि स्वतःलाही क्षमा करा त्यामुळे आज्ञाचक्र उघडते. सहजमध्ये आल्यावर लोक जेव्हा काम करतात तेव्हा ते म्हणतात "हे होते आहे", हे चालले आहे, हे बनते आहे, सहजयोगात आपल्यांला पार व्हावं लागतं. जर पार झालं नाही तर खोटं सर्टिफिकेट हा "हा पार झाला आहे" असं देऊ शकत नाही. ज्याप्रमाणे एका बीजा झाड व्हायचे आहे त्याप्रमाणे आपल्याला वृक्ष व्हायचे आहे. हळू हळू कुण्डलिनी आपल्याला घडवते व तिकडे आपल्याला लक्ष द्यावे लागते. कुंडलिनीचे जागरण करणे फार सहज आहे. पण त्यानंतर त्यालां सांभाळावे लागते. समजून घ्यावं लागतं. आपल्यामध्ये शक्ति वाढू लागते, हे कार्य सर्वात जास्त दिल्ली, जी राजधानी आहे तिथे झाले पाहिजे. पण इथे काय होतं आहे? भांडणे। धर्माच्या नावांवर भांडणे करणे ही फार मूर्खपणाची गोष्ट आहे. धर्म कधी भांडणे शिकवू शकत नाही. परमात्मा तर रहमत आहे रहीम आहे दयेचा सागर आहे. त्यांच्या आश्रयांत राहणारे कसे भांडतील। सहजयोगामध्ये प्रत्येक प्रकारचे लोक आहेत. मुसलमान, हिंदू, ख्रिश्चन इत्यादि. हे सर्व लोक आपापसांत इतक्या प्रेमाने राहतात. त्यांना असं वाटतं की ते विराटाच्या अंगप्रत्यंगातील एक आहेत.

सागरांतला एक थेंब आहे. जो हरवला आहे. आणि सागरामुळे एकात्म्य आले आहे आणि मी सागरच आहे. आतां ही आपल्या लाभाची गोष्ट आहे, आणि सा-या विश्वाच्या कल्याणाची गोष्ट आहे. हिला आपण समजून, शुध्दतेने प्राप्त करा, आणि यामध्ये जम बसवा. आपणां सर्वांना माझे अनंत आशिर्वाद.